# प्रकरण ३

# संकलित धनगरी लोकगीतांचे रसास्वादात्मक विवरण

## प्रकरण – 3

## संकलित धनगरी लोकगीताचे रसास्वादात्मक विवरण

**संकलित धनगरी लोकगीतांचे रसास्वादात्मक विवरण :-**

अ) **समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून धनगरी लोकगीतांचा अभ्यास :-**

समाजशास्त्र आणि लोकसाहित्य यांचा परस्पर संबंध :-

आजपर्यंत मराठी लोकसाहित्याचे संकलन व प्रकाशन भरपूर झाले आहे. परंतु मराठी लोकसाहित्याच्या समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून व मानवशास्त्रीय दृष्टीकोनातून फार थोडा अभ्यास झालेला आहे. हीच उणीव धनगरी गीतांच्या संदर्भात प्रकर्षाने जाणवते. त्यामुळे समाजशास्त्रीय दृष्टीने व मानवशास्त्रीय दृष्टीने धनगरी गीतांचा अभ्यास करण्याचा माझा प्रयत्न आहे. धनगरी गीते हे लोकसाहित्याचेच एक अंग आहे. लोकसाहित्य आणि लोकजीवन यांच अतुट संबंध आहे. त्याचे स्वरूप परस्परावलंबी आहे. त्यामुळे धनगरी गीतांच्या अभ्यासाला पर्यायाने लोकजीवनाच्या अभ्यासाचे स्वरूप प्राप्त होते. धनगरी लोकगीतातून अभिव्यक्त होणारे लोकजीवन हे अधिक महत्वाचे आहे. धनगरी गीतातून व्यक्त होणाऱ्या लोकजीवनाचा मागोवा घेण्याचा माझा या अभ्यासाचा उद्देश आहे. असे केल्यामुळे धनगरी गीतातून व्यक्त झालेले वास्तव जीवनदर्शन अजमाविता येईल. त्यामुळे धनगरी गीतातील वाङ्‌मयीन सौंदर्य रसिकांना उकलून दाखविता येईल व त्यांना त्याचा रसास्वाद घेता येईल.

1858 साली 'Old Deccan Day's' या पुस्तकात काही लोककथा व ऐतिहासिक दंतकथा संकलित करून मेरी फ्रियर या पाश्चात्य लेखिकेने लोकसाहित्याच्या संकलनाला व चर्चेला प्रारंभ केला. त्यानंतर आपल्याकडे सदाशिव काशिनाथ छत्रे, राजारामशास्त्री भागवत, विष्णुशास्त्री चिपळुणकर, महादेव मोरेश्वर कुंटे, काशिनाथ महादेव लेले आदि विद्वानांनी

लोकगीतांचे संकलन करून त्यातील सौंदर्यदर्शन घडविण्याचा प्रयत्न केला. इ.स.1875 मध्ये राजारामशास्त्री भागवत यांनी "गोंडी भाषा व गीते" हा लेख समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून लिहिला व प्रसिध्द केला. इ.स.1925 साली श्री.नवरे यांनी महाराष्ट्र साहित्य पत्रिकेत म्हणी सातत्याने प्रसिध्द केल्या. तर ना.गो.चाफेकर यांनी महाराष्ट्र साहित्य पत्रिकेत "लोकगीते व लोककथा" प्रकाशीत केल्या. 1930 साली शं.गो.दाते यांच्या "लोककथा" या पुस्तकाच्या प्रस्तावनेत म.म.पोतदार यांनी 'Folklore' साठी "लोकविद्या" हा शब्द वापरला. "लोकविद्या" या शब्दात "लोकगीते व लोककथा" या बरोबर इतर अनेक प्रकारांचा समावेश होतो याची स्पष्टता करून त्यांनी "लोकविद्या" शब्दाची व्यापकता स्पष्ट केली. वा.दा.मुंडले यांनी भारत इतिहास संशोधन मंडळाच्या इतिवृत्तातून लोकगीतांचा दर्जेदार संग्रह निर्माण केला. अशाप्रकारे 1930 सालानंतर इतिहास संशोधक मंडळ तसेच महाराष्ट्र साहित्य पत्रिकामधून निरनिराळया संकलनकारांनी लोकगीते संकलित करून प्रसिध्द केली. व लोकगीताच्या संकलनाला भरते आले. या लाटेत धनगरी गीतेही संकलीत व प्रकाशीत झाली.

साने गुरूजी यांनी "स्त्रीगीते" हा गीतसंग्रह प्रकाशित करून स्त्री जीवनाचे दर्शन घडविले. तर वामन चोरघडे आणि काका कालेलकर यांनी "साहित्याचे मूलधन" हे लोकसाहित्या विषयीचे संकलन प्रकाशित केले. पा.श्री.गोरे यांनी वऱ्हाडी लोकगीते, कमलाबाई देशपांडे यांनी "अपौरूषेय वाड्.मय", वि.ग.भिडे यांनी "श्रावणसरीत", "मोत्याचे कणीस" तर शेंडे बोरसे, डॉ.ना.गो.नांदापूरकर यांनी अनुक्रमे विदर्भ, खानदेश, मराठवाडा या भागातील लोकगीतांचे संकलन करून ग्रंथ प्रकाशित केले. "माहेरची मराठी", "मराठीचा मोहोर", "मराठीची माया" असे मराठवाडयातील संग्रहही प्रकाशित झाले. या संकलनकारांनी विद्यार्थ्यांना या कामात सहभागी करून घेतले. त्यामुळे मराठवाडयात स्त्रीगीतांच्या संग्रहाची एक मोठी चळवळ सुरू झाली व लोकसाहित्य मंडळाने अशाच संकलनाला प्रसिध्द करण्याचे सहकार्य दिले. लोकसाहित्य मंडळाच्या अध्यक्षा व लोक वाड्.मयाच्या अभ्यासक डॉ.सरोजिनी बाबर यांनी "मराठीतील स्त्रीधन", "बाळराजा", "जा माझ्या माहेरा", "एक होता राजा", "जन लोकांचा सामवेद" असे सुमारे 30/35 लोकगीत संग्रह

प्रकाशित केले. डॉ.यू.म.पठाण यांनी "लोककथांचा" एक संग्रह प्रकाशित केला. हे सर्व प्रयत्न लोकसाहित्याच्या अभ्यासासाठी उपयुक्त व उपकारक ठरले. परंतु समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून लोकसाहित्याचा अभ्यास फारसा झालेला नाही.

सातारा जिल्हयातील खंडाळा तालुक्यातील लोणंद परिसरातील धनगरी गीते, घरोघर व खेडोपाडी जाऊन मी गोळा केलेली आहेत व त्यांचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करण्याचा हा माझा प्रयत्न आहे. आजपर्यंत बहुतेक सर्व संकलनकारांनी गुरूदेव टागोराकडून स्फूर्ती घेऊन केवळ काव्य म्हणून लोकगीतांचा अभ्यास केला आहे. त्यामुळे लोकगीतांचे केवळ रसाळ व कल्पनारहस्य समालोचन केले गेले आहे. ते समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून होण्याचे ते आवश्यक असल्याचे प्रा.नरहर कुरूंदकर[1], श्रीमती दुर्गा भागवत[2] यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. एकंदरित लोकसाहित्याच्या अभ्यासात समाजशास्त्रीय दृष्टीकोनाची काहीशी उपेक्षाच आढळत असली तरी दुर्गा भागवत यांनी लिहिलेल्या "लोकसाहित्याची रूपरेषा" व इतर विषयावरील अभ्यासपूर्ण लेखन तसेच इरावती कर्वे यांनी केलेले लोकगीत विषयक शास्त्रीय लेखन पाहिल्यास त्यांच्या लेखनामागे मानवशास्त्र आणि समाजशास्त्र यांची भक्कम बैठक आहे हे निश्चितपणे जाणवते.

काही पाश्चात्य लेखकांनी महाराष्ट्रीय लोकसाहित्यासंबंधी महत्वाचे लेखन केले आहे. उदा.एन्थोवन यांचे "The Folklore of Bombay" (1924) तसेच "Pribes and Casts Bombay" (1926) हे ग्रंथ फर्ग्युसन यांचा "वृक्षपूजा व सर्पपूजा" यावरील शास्त्रीय अभ्यास, हिस्लॉप यांनी "नागपूरकडील आदिवासी लोकांचा केलेला जीवनाभ्यास," डॉ.आगरकर यांनी महाराष्ट्रातील लोकनृत्याचा केलेला चिकित्सक अभ्यास इ.

**लोकसाहित्य व लोकवाङ्मय** :-

अगदी अलीकडेपर्यंत लोकसाहित्य व लोकवाङ्मय हे दोन्ही शब्द एकाच अर्थी प्रचलीत होते. परंतु लोकवाङ्मय हे लोकसाहित्याचे अंग आहे. लोकसाहित्यात लोकवाङ्मयाबरोबरच इतर अनेक अंगाचा समावेश होतो. हे अनेकांनी सनजून घेतलेले असावे. त्यामुळे "लोकवाङ्मय" या

शब्दाच्या उल्लेखाने लोकसाहित्याची चर्चा झालेली आहे. या संदर्भात डॉ.नांदापूरकरांचे विचार लक्षात घेणे उचित ठरते. ते म्हणतात –

"लोकवाड्.मय म्हणजे माझ्या दृष्टीने तरी लोकांनी निर्माण केलेले आणि मौखिक परंपरेने प्राप्त केलेले वाड्.मय म्हणजे लोकवाड्.मय होय. त्याचा कर्ता लोकच अर्थात अज्ञान अशी लोक समाजातील व्यक्ती. वास्तव लोकांनी केलेले, लोकभाषेत केलेले आणि लोकांच्या परंपरेबरोबरच चालत आलेले जे वाड्.मय तेच लोकवाड्.मय होय. वाड्.मयाच्या या प्रकारात लोककथा, कहाण्या, आखाणे, उखाणे आणि लोकगीते ही येतात. स्त्रीगीते हा त्यातीलच एक भाग आहे."[3]

याप्रमाणे धनगरी लोकगीताचाही यात अंतर्भाव आहे. लोकवाड्.मयात व पर्यायाने धनगरी गीतांतही परंपरेने चालत आलेल्या लोकजीवनाचा अविष्कार असतो. एका अर्थाने लोकसाहित्यात लोकजीवनाचीच अभिव्यक्ती असते. लोकसाहित्यात लोकवाड्.मयाबरोबरच म्हणजेच धनगरी गीताबरोबर लोकजीवनात परंपरेने चालत आलेल्या रूढी, समजुती, आचारविचार, धर्मविधी, लोकनृत्य, लोकनाटय या सर्वांचा समावेश होतो. पाश्चात्य लोकसाहित्य संशोधकांनी लोकसाहित्य हे एक पारंपारिक लोकजीवनाचाच आविष्कार आहे. हे ओळखून समाजशास्त्रीय दृष्टीने त्याचा अभ्यास केला आहे. पण मराठीमध्ये असा प्रयत्न फारसा झालेला आढळत नाही.

लोकजीवनाचा व्यापक दृष्टीने विचार केला तर लोकसाहित्य व लोकजीवन यांचा अतुट संबंध आहे हे स्पष्ट होते. लोकजीवन लक्षात घेतल्याखेरीज लोकसाहित्याचा अभ्यास होणे अशक्य आहे. म्हणून लोकसाहित्यात लोकजीवनाचेच चित्र उमटलेले असते व त्यात परंपरागत चालत आलेल्या प्राचीन जीवनाचे अवशेष असतात. यावरून मला येथे लोकसाहित्य ही विशुध्द वाड्.मय कला कधीच नसते हेच सांगावयाचे आहे. त्यामुळे लोकवाड्.मयातील साहित्य गुणांना मर्यादा पडतातच. एखाद्या श्रेष्ठ साहित्यकृतीचे वाड्.मयीन गुण लोकवाड्.मयात सापडणार नाहीत असे नाही पण त्याला मर्यादा पडलेल्या असतात हे ही विसरून चालणार नाही. तात्पर्य हेच की साहित्यकृतीच्या वाड्.मयीन गुणवत्तेची मूल्ये लोकवाड्.मयाला लावणे बरोबर ठरणार नाही. कारण

लोकवाङ्‌मय आणि इतर साहित्यकृती यांच्या प्रकृतीत मूलतः फरक असतो. लोकवाङ्‌मयाचा केवळ वाङ्‌मयीन दृष्टीने अभ्यास होणे शक्य नाही. लोकसाहित्य ही लोकसमूहाची निर्मिती असते त्यामुळे लोकसाहित्याला लोकसमूहातून अलग करता येत नाही आणि तसे करण्याचा प्रयत्न केला तर "आत्म्यावाचून शरीर" अशी लोकसाहित्याची गत होईल. लोकांनी प्रत्यक्ष जगलेले जीवन लोकसाहित्यातून व्यक्त होत असते व अशा साहित्यातून समाजाची एखादी गरज भागत असते.

"लोकसाहित्यातून समाजजीवनाचा आविष्कार होत असतो आणि समाजजीवनाला आकार देण्याचे कार्य लोकसाहित्यातून घडत असते."[4]

काळाच्या ओघात समाज जीवनात परीवर्तने घडत असतात. लोकसाहित्यातही या परीवर्तनाचे पडसाद उमटलेले आढळतात. लोकसाहित्यात परिवर्तनशीलता आढळत असली तरी पूर्वपरंपरेने चालत आलेल्या काही शाश्वत मूल्यांची लोकसाहित्य जपणूक करीत असते. समाज परिवर्तनाच्या घडामोडीत भूतकालीन जीवनाचे अवशेष समाजजीवनात शिल्लक असतात. ते अवशेष शब्दबध्द वाङ्‌मयातून काही अंशाने प्रकट होत असतात. ते परंपरागत चालत आलेल्या सर्व समजुती धार्मिक आचार–विचार यातून प्रत्ययास येतात. लोकजीवनाच्या आधाराशिवाय लोकसाहित्य जीवंतच राहू शकत नाही. परिवर्तनाच्या घडामोडीत समाजात नवा जुना असे दोन वर्ग निर्माण होतात. नव्या जीवनमूल्याचा स्वीकार केलेला एक वर्ग असतो. त्याला जुन्या लोकांच्या जीवनामध्ये प्रचलित असलेल्या लोकगीते, रूढी, आचार–विचार याविषयी कुतूहल निर्माण होते व या कुतूहलपूर्तीसाठी लोकसाहित्याच्या अभ्यासाची आवश्यकता निर्माण होते. या परिवर्तनाचे लोकसाहित्यात उमटलेले सादपडसाद समजून घेण्याची स्वाभाविक वृत्ती काही लोकांच्यामध्ये असते. म्हणून लोकसाहित्याचा (Lore) अभ्यास समाजशास्त्रीय आणि मानवशास्त्रीय दृष्टीकोनातून करणे योग्य ठरते असे डॉ. प्रभाकर मांडे[5] यांचे प्रतिपादनही लक्षात घेण्यासारखे आहे.

लोकसाहित्यात लोकमानसाचा आविष्कार असतो. आणि लोकमानस विविध माध्यमातून व्यक्त होत असते. लोकमानस कृती, उक्तीतून प्रकट होते. कृती आणि उक्ती यांच्यात अभेद्य

असतो व त्यामुळे लोकगीताचा अभ्यास करतात. ज्या विधीशी त्याचा संबंध असतो त्या विधींचा विचार करणे आवश्यक ठरते. धनगरी जीवनाचा आविष्कार त्या समाजाच्या कृती उक्तीतून प्रगट झालेला आढळतो. त्यामुळे धनगरी लोकगीतातून धनगर समाजाच्या शब्दबध्द आविष्काराबरोबरच त्या समाजात परंपरेने चालत आलेल्या रूढी, समजुती, आचार–विचार, विधी या सर्वांचे स्वरूप पाहणे मला आवश्यक वाटते. थोडक्यात म्हणजे सातारा जिल्हयातील खंडाळा तालुक्यातील लोणंद परिसरातील धनगरी लोकगीतांचा अभ्यास करणे येथे अभिप्रेत आहे. त्यासाठी सातारा जिल्हयातील भौगोलिक, ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ लक्षात घेऊन धनगरी लोकगीताचा अभ्यास मी केला आहे. म्हणूनच आजपर्यंतच्या सामाजिक परिवर्तनाचा अपेक्षीत परिणाम लक्षात घेऊन समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून संकलीत धनगरी गीतांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न मी केला आहे.

**धनगरी गीतात उमटलेले लोणंद परिसरातील भौगोलिक ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक चित्र :–**

महाराष्ट्राच्या व भारताच्या इतिहासात लोणंद परिसराला आगळेवेगळे भौगोलिक महत्व आहे. हे महत्व धनगरी गीतातून प्रकट झाले आहे. लोणंद मधील धनगर आपल्या गीतात लोणंदच्या भौगोलिक परिसराचा उल्लेख करताना म्हणतो. उदा.

"खंडोबाच्या नावान चांगभल
डोंगरच्या हरीचं चांगभलं
घाटातल्या बिरदेवाचं चांगभल"

अशाप्रकारे या परिसरातील धनगरी लोक आपल्या भागातील देवतांकडे मागणे मागतात की माझ चांगल होऊ दे. मला कोणतीही अडचण येवू देवू नकोस. तर पंढरपुरला जाताना माझी आजी लोणंदच्या परिसराचा आपल्या गीतात उल्लेख करताना ओवीमध्ये म्हणते –

"पंढरीला जाया आडवं लागलं लोणंद

संग माझ्या राघू मैना जिवा माझ्याला आनंद

पंढरीला जाया आडव लागलं कापडगाव

हिरव्या चोळीवरी देवा विठ्ठल तुझ नावं

पंढरीला जाया आडवं लागलं तरडगाव

देवा त्या विठ्ठलाची हवा रिंगणी पहावं"

या ओव्या वाचल्या की लोणंद परिसर हा लोकगीतातील एक विषय झालेला आढळतो. प्रत्येकाला आपला गाव व परिसर किती जीवाभावाचा वाटतो ते यावरून लक्षात येते. तर सालपे गावची प्रसिध्दी तेथे असणारा बिरोबा देव याविषयी ती म्हणते –

"गावा मधी गाव गाव सालप नकाशाच

देव त्या बिराजीच चारी दरावज मोकाशाच"

असा आर्त भाव ती आपल्या ओवीतून व्यक्त करते.

ऐतिहासिकदृष्टया शिरवळचा सुभान मंगल भुईकोट किल्ला प्रसिध्द आहे. लोणंद परिसराला भुईकोट किल्ल्याचे वरदान लाभल्याने त्याला भक्कम ऐतिहासिक पार्श्वभूमी निर्माण झाली आहे. त्यामुळेच या गडाचे नाव घेताच छ.शिवाजी महाराजांची आठवण होते. लोणंद परिसरातील धनगरी स्त्रिया आपल्य गीतातून दळणकांडण करताना छत्रपतींचा उल्लेख स्वाभीमानाने करतात. तसेच जेजुरी किल्ल्याची जवळीक लोणंद परिसरात रहाणाऱ्या लोकांना लाभली आहे. जेजुरीचा खंडोबा हा धनगराचा जीव की प्राण असलेला देव. लोणंद परिसरातील महिलांनी, आयाबायांनी आपल्या कंठात जिरवून टाकलेला आहे. कंठात जिरलेला, ऱ्हदयात विरून गेलेला या जेजूरीच्या खंडोबाला आळविताना धनगर महिला आपल्या गीतात म्हणते –

"नवलाख पायरी गड जेजुरी पडला वेडा

चढुनि गेला शिंद्या व्हळकारा तुझा घोडा

नवलाख पायरी गड जेजुरी तळाला

सोन्याची खंटी दिली गवंडयाच्या बाळाला."

असा शिंदे–होळकर यांच्या पराक्रमाबद्दल व जेजुरी गडाच्या कलेबाबत धनगर महिलेचा ऊर भरून येतो व ती आपली आठवण व्यक्त करीत असते. छ.शिवाजी महाराजांनी तयार केलेल्या वीर पुरूषांची गाथा लोणंद परिसरातील स्त्रिया आजही गातात.

लोणंद परिसरातील अनेक कार्यकर्त्यांनी विविध शिक्षण संस्था स्थापून शैक्षणिक कार्याचा दिप तेवत ठेवून कर्मवीर भाऊराव पाटील उर्फ आण्णा शिक्षण प्रसाराचे कार्यात अग्रभागी आहेत. शैक्षणिक दृष्टया मा.शंकरराव गाढवे हे या तालुक्याचे दुसरे "आण्णाच" आहेत. त्यांनी स्थापन केलेल्या संस्थेमुळे शिक्षणाची गंगा बहुजन समाजाच्या झोपडीपर्यंत येऊन ठेपलेली आहे. रोजच्या जीवनात आवश्यक असलेला कांदा हे लोणंद परिसरातील महत्वाचे उत्पन्नाचे साधन आहे. या परिसरातील कांदा परदेशात जातो. त्यामुळे अलीकडच्या काळात आर्थिक विकास झालेला आहे. लोणंदच्या परिसराला मोठी राजकीय परंपरा आहे. त्याला सातारा जिल्हयातले पाठबळ आहे. भारताच्या भूप्रदेशावर दैदिप्यमान ठरलेला सातारा जिल्हा विविध क्षेत्रात अनेक मानदंड मिळवून आहे. स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतलेला सातारा, त्या जिल्हयातील आमचे गाव, ऐतिहासिक संदर्भानी सनृध्द असलेला सातारा जिल्हा, अजिंक्यतारा हा दुर्गम किल्ला छत्रपतींनी पराक्रमाची शर्थ करून 11 नोव्हेंबर 1675 साली हा किल्ला त्यांनी जिंकला. राजाराम महाराजांनी 1698 साली सातारा ही मराठा राज्याची राजधानी केली. तर 1708 मध्ये याच अजिंक्यताऱ्यावर शाहू महाराजांचा राज्याभिषेक झाला. पारतंत्र्याच्या काळात सातारा जिल्हयातील अनेक सैनिकांनी स्वातंत्र्य संग्रमात प्राणाचे बलिदान केले आहे. क्रिडा क्षेत्रातही तो पुढे आहे. भारतामध्ये पहिली नगरपालिका सातारा जिल्हयातील सातारा गावी स्थापन झाली. लोकमान्य टिळक, म.गांधी, स्वातंत्र्यवीर सावरकर या लोकनायकांचे कितीतरी अनुयायी साताऱ्यात होते व आहेत याही परिसरात आहेत. एकूणच राष्ट्रीय चळवळीत सातारा जिल्हा अग्रेसर राहिला आहे.

धनगरी लोकगीतांचा अभ्यास म्हणजे लोकसाहित्याचा अभ्यास. लोकसाहित्य हे समाजशास्त्राच्या अभ्यासाचे एक साधन आहे. हे मला येथे दाखवून द्यावयाचे आहे. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून लोकसाहित्याचा विचार केला तर लोकसाहित्यात व्यक्ती आणि समाज

यांच्या जीवनाशी निगडीत असलेल्या विविध सामाजिक संस्था, विवाहसंस्था, कुटुंबसंस्था, राज्यसंस्था, अर्थसंस्था या संबंधीचे भावजीवन लोकसाहित्यात भावनिक होवून प्रकट झालेले असते. लोकसाहित्याची समूहमनाला ओढ लागलेली असते. 21 व्या शतकाकडे वाटचाल करीत असताना लोकसाहित्यात प्रकट झालेले जनमानस आजच्या नव्या पिढीला आकर्षित करीत आहे. विज्ञानाकडे वाटचाल करणाऱ्या आजच्या समूहमनाला एकटेपणाची जाणीव होवू लागली आहे. त्यामुळे समुहमनात मिसळावें असे नव्या समाजाला वाटू लागले आहे. लोकसाहित्याच्या अभ्यासाने समुहमनाची ओढ आज वाटू लागली. आजच्या समूहमनाला जे काही हरविले आहे असे वाटत आहे ते लोकसाहित्यात गवसले आहे असे वाटत आहे. म्हणूनच मानवी समूह लोकसाहित्याकडे वळू लागला आहे असे मला वाटते.

लोकसाहित्य ही एकाचवेळी दृक व श्राव्य कला आहे. जगातील लोककथा, लोकगीते, निरनिराळया भौगोलिक, ऐतिहासिक परिसराशी निगडीत असल्याचे दिसते. मानव हा थोडया फार फरकाने सर्वत्र एकच असतो असे जाणवते. लोकसाहित्य हे सर्व वर्गाचे, सर्व थराचे मनोगत व्यक्त करणारे साहित्य आहे. व ते कोणा एका वर्गाचे किंवा सामाजिक स्तराची मालमत्ता नाही व नव्हती. लोकसाहित्यामुळे माणुस एकत्र येतो. लोकसाहित्य ही एक कला आहे व तिच्या आस्वादासाठी जाती, वर्ग, धर्म, भाषा, वर्ण विसरून लोक एकत्र येताना आढळतात. म्हणूनच लोकसाहित्याचा अभ्यास समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून होणे आवश्यक ठरते. या दृष्टीने धनगरी गीतांचा ही अभ्यास मला अभिप्रेत आहे.

मानवी मनाचे व्यापार पूर्वीपासून आजपर्यंत जसे आहेत तसेच आहेत. उदा.पूर्वीचा योध्दा व आजचा योध्दा. युध्दावर जाताना आपल्या परिसराचा जड अंत:करणानेच निरोप घेतो. सुख, दु:ख, आनंद, राग, लोभ, मत्सर, क्रोध हे मानवी व्यापार येथून तेथून सारखेच असतात. या सर्व व्यापारांना मानवी जीवनाचाच आधार दिसतो. आजच्या नव्या साहित्यात मानवी जीवनाचे आविष्कार जुन्या जीवनाचा आधार घेऊनच व्यक्त झालेले असतात. तात्पर्य साहित्य हे

लोकजीवनाचे व समाजमनाचे भान विसरू शकत नाही. मराठीतील लोकसाहित्य आणि महाराष्ट्रातील सांस्कृतिक जीवन हे परस्परावलंबी आहे. त्यामुळे लोकसाहित्य समृध्द होण्यास मदत झाली आहे.

सातारा जिल्हयातील संकलीत लोकसाहित्याचा विचार केला तर लोकसाहित्याने मराठी लोकसाहित्याची कुस समृध्द केली आहे यात शंका नाही. पर्यायाने धनगरी लोकगीतांनी लोकसाहित्याच्या समृध्दीत भर घातली आहे असे मला वाटते. महिलांनी जात्यावर गायलेल्या ओव्या, गाणी, क्रांतीकारकांनी केलेल्या स्वातंत्र्याच्या चळवळी, क्रांतीसिंह नाना पाटील, पांडु मास्तर, किसन वीर यांनी केलेल्या सामाजिक राजकीय चळवळी व त्यांनी पसरवलेले जागृत विचार शेतकरी, कामकरी लोकांच्या जीवनावरील गीते, धनगर समाजातील स्त्री–पुरूषांनी गायलेली गीते, पोवाडे, आरंभलेले धार्मिक विधी, मेंढयाचे कळप घेऊन जाताना, श्रमपरिहारासाठी गायलेले सुंबराने, गजनृत्य, ओव्या इ. लोकसाहित्यात सर्व सातारा जिल्हयातील लोकसाहित्याने भावना व विचार जागृती केली आहे. उदा.

"बाई माझ्या ग अंगणात
आवाज कसला धडकतो
झेंडा तिरंगी फडकतो
बाई माझ्या ग अंगणात
कोण गात ग राष्ट्रगीत
बाळ माझा ग किसनवीर
कधी होईल जवाहिर."

लोणंद परिसरातील सांस्कृतिक जीवनाविषयीचे विचार, भावना धनगरी महिला व्यक्त करते.

अशी धनगरी महिलेच्या मुखातून उत्स्फूर्तपणे पाझरलेली लोकगीते म्हणजेच भावनागीतच आहेत. याची जाणीव होऊन "कन्या सासुराशी जाये, मागे परतुनी पाहे" या संत तुकारामांच्या

ओवीची आठवण झाल्याशिवाय रहात नाही. भावनेत बुचकळून उत्स्फूर्तता प्रकट झालेल्या या धनगरी लोकगीतातून समाज मनाचे दर्शन घडते.

या धनगरी गीतांचा अभ्यास करताना मला प्रकर्षाने जाणवते ते हे की धनगरी गीतांनी समाजाला नविन विचार देण्याचे, समाजमनाची दखल घेण्याचे, बुध्दी वाढविण्याचे, स्वतःच्या भावना स्वतःची सुखदुःखे, आपली जिज्ञासा जागृत करण्याचे काम केले आहे. आपली संस्कृती, आपला इतिहास, आपली झालेली भौतिक प्रगती यातून स्वतःचा शोध घेण्याचा प्रयत्न लोणंद परिसरातील स्त्रीगीतांनी केला आहे. लोकसाहित्य म्हणून ओळखले गेलेल्या जातककथा, सिंहासन बत्तीशी, शुकबहात्तरी, बिरबल बादशहाच्या गोष्टी इ. मधून भारतीय समाज जीवनाचे वैशिष्टये कायम टिकून राहिलेले आढळते. लोणंद परिसरातील धनगरी लोककथा व लोकवाङ्‌मयातील उखाणे, म्हणी, रूखवताच्या गाण्यामधून धनगर समाजाच्या आदर्शाचे उल्लेख आढळतात. नवरा–नवरी कशी असावी हे सांगताना धनगर महिला रूखवतात म्हणते की –

"आला आला रूखवत रूखवतात हत्ती
नवरा चंद्राची कोर नवरी बिजलीची बत्ती
"आला आला रूखवत रूखवतात होता गरा
नवरी चंद्राची कोर, नवरा चंदनहिरा त्याला जरीचा पोशाख करा."
"आला आला रूखवत रूखवतात आटारबटार
आमचा नवरदेव मागतूय तिनशेची मोटार."

धनगरी लोकगीतातून लोकजीवन प्रगट झालेले आढळते हे जीवन साधे व सकस असते म्हणूनच धनगरी लोकगीतांची अभिरूची वाढते. तात्पर्य लोकजीवन व लोकसाहित्य यात फरक आढळत नाही. आजच्या साहित्याचा विचार केला तर जीवन व साहित्य यात बरीच तफावत आढळते.

समाजात जे चाललेले आहे ते अगदी साध्या सोप्या पध्दतीने, स्पष्टपणे, अकृत्रिमपणे लोकसाहित्यात आढळते. हेच वैशिष्टये धनगरी लोकगीतात मला प्रकर्षाने जाणवले. मी

अभ्यासलेल्या धनगरी गीतातून मानवी मनाचे स्पष्ट, सरळ रूप मला आढळते. धनगरी समाजात प्रचलित असलेल्या उखाणे, म्हणीतून सामाजिक शुभ, अशुभतेच्या कल्पना स्पष्टपणे लक्षात घेता येतात. उदा. पातिव्रत्याचा महिम्न, माहेरची ओढ, सासरचे दु:ख, नवरा, सासरा, घराचा महिमा इ.

"माहेराला ग जाते सर्वी हायती माझी सुखी
जीवू वाढाई ब्याबाई ताठ धुवाय भावजयी"
"मैना सासऱ्या जाया उभी चौकटी धरूनी
तान्ह्या त्या मैनाच आल ऊर भरूनी"
"मैना सासऱ्या जाया बाप म्हणतु जा ग बया,
आईची वेडी माया लांब जातीया घालवाया"
"पिकली जांभळ शेती शिवला
लेकीची समसम आयबापाच्या जीवाला"
"नको मारू साप लेकरा बाळाचा बाप"
"चोरी माग दोरी संसाराला घोरी"
"रीनाची बुचबुच चोळी लुगडी उच"
"घरात घान मी दिसते गोरीपान"
"घरची म्हणे देवादेवा अन् बाहेरचो म्हणे चोळी शिवा "

अशा प्रकारे अनैतिक वागणाऱ्या स्त्रीला लोकसाहित्य टोला मारते. सर्वच समाजात कुलदैवतांचे महत्व आढळते. महाराष्ट्रातील समाज आपल्या कुलदैवताला कोणत्याही कार्यात प्रथम भावांजली अर्पण करतो. महाराष्ट्रातील धनगर समाज जेजुरीच्या खंडोबाला आपली भावांजली अर्पण करण्यास कधीच विसरत नाही. लोणंद परिसरातील धनगर समाज खंडोबाला, बिरोबाला आपले कुलदैवत मानतो. शुभकार्यात प्रथम आपली भावांजली अर्पण करतो. उदा.

"म्हाळसाला साडीचोळी मल्हारीला ग मंदील ,
बाळ राजस ग माझा तुझा उतारा बांधील"

"देव ती बिराजी उभ राहील गजन्यात

तान्ह्या या राघुबाची आरती शेल्याच्या पदरात."

यावरून धनगर समाजाच्या सांस्कृतिक इतिहासाची ओळख होते. सणवार कसे साजरे होतात. उत्सव, यात्रा, परिसर याबाबत काय वैशिष्ट्ये आहे हे धनगरी गीतातूनच समजते. अन्यथा धनगर समाजाची संस्कृती कळणे, अवघड झाले आहे. आजच्या नव्या युगात कित्येतरी पध्दती आचार बंद पडल्या तरी त्याच्या खाणाखुणा धनगरी लोकगीतातच आढळतात. धनगरी ओव्यामधून आपल्याला सणवार कसे साजरे होतात याचे तपशिलवार वर्णन आढळते. तात्पर्य प्रत्यक्ष काही पध्दती बंद पडल्या तरी त्यांची ओळख पूर्णपणे दृष्टीआड होणार नाही. धनगरी ओव्या संकलित झाल्यावर त्या पध्दती जीवंतच राहतील व मानववंश शास्त्राच्या अभ्यासाला यातून आधार सापडेल. धनगरी ओव्या या धनगर स्त्रीचे मन, तिचे वागणे, तिचे आचार विचार, तिचे कल्पना विश्व समजून घेण्यास उपयुक्त ठरतात. धनगरी ओव्या ह्या एका दृष्टीने धनगरी जीवन समजून घेण्यास मार्गदर्शक ठरतील.

अशाप्रकारे अतिशय स्वाभाविक पध्दतीने लोकसाहित्य कृत्रिमतेला टोला मारते व नैसर्गिक भावदर्शनाचा सहजसुंदर भाषेत स्विकार करते. कोणत्याही अनिष्ट गोष्टींवर पांघरूण घालण्याची वृत्ती लोकसाहित्यात नसते. ईष्ट असेल ते स्पष्ट शब्दात सांगण्याची लोकसाहित्याची धाटणी असते. म्हणूनच मला असे वाटते. लोकगीते व पर्यायाने धनगरी गीते समाजाला त्याचे दोष दाखवून त्याला योग्य मार्ग दाखविण्याचे प्रयत्न करतात.

लोकसाहित्य हे सामाजिक आदर्श दाखवून देते. लोक आदर्शाची जपणूक होणे आवश्यक आहे. सामाजिक आदर्श टिकवून धरण्यासाठी लोकसाहित्याची जपणूक होणे आवश्यक आहे असे मला वाटते. आणि म्हणून लोकगीतांचा आणि धनगरी गीतांचा अभ्यास होणे आवश्यक आहे. मला माझ्या जातीचा, व्यवसायाचा आणि माझ्या धनगर जीवनाचा, समाजाचा अभिमान वाटतो. धनगरी लोकगीतातून व्यक्त झालेले हे व्यक्ती आदर्श, सामाजिक आदर्श, धार्मिक आदर्श

टिकवून धरण्यासाठी हा अभ्यास मला महत्वाचा वाटला म्हणून धनगरी गीतांचे मी संकलन केले आहे व धनगरी गीतांना संकलित करून ग्रंथरूप देण्याचा मी प्रयत्न केला आहे. धनगरी गीतातून व्यक्त झालेले देवभाव, व्यक्तीभाव, सांस्कृतिक भाव आजही वाचकाच्या मनाचा वेध घेतात. यावरून लोकसाहित्याची समाजाला असलेली ओढ येथे व्यक्त होते. लोणंद परिसर हा निसर्गरम्य असून डोंगरकपारींचा प्रदेश आहे. येथील निसर्ग परमेश्वराच्या आदीशक्तीचा साक्षात्कार घडवितो. माझ्याप्रमाणे इतर लोकांचाही हा अनुभव आहे. लोणंद परिसरातील बायाबापडया धनगरी देवादिकांची गाणी गातात. खंडोबा, बिरोबा, वाग्देव, धुळोबा, कडजाई, वडजाई इ. देवांचे वर्णन करतात. त्यांना देवादिकांमध्ये मानवाचे दर्शन घडते. या देवादिकांत मल्हारी–बानु, शंकर–पार्वती, विठ्ठल–रूक्मिणी, धुळोबा–भिवाई, श्रीकृष्ण–रूक्मिणी, श्रीकृष्ण–राधा, उगवता सुर्य, मावळता सूर्य, आकाशातला चांद, अंगणातील तुळस इ. या सर्वांना हात जोडणारी धनगर स्त्री आपल्या प्रपंचात आशावाद निर्माण करते. आयुष्याला श्रध्देने सामोरे जाते. लोणंद परिसरातील अशा प्रकारची गृहणी लोकसाहित्यात चित्रित झालेली आढळते. उदा.

"तुळशी पतिव्रता नको राहूस जंगलात
जागा देते मी अंगणात"
तुळशीबाईला कुठलं मायबाप
काळया वावरी आल रोप
तुळशीबाईला कुठली नखबोट
तिच्या खोडाला पाला फुट
तुळशीबाईची मस्करी कुणी केली
वाऱ्या त्या सैतानात तिची मंजुळ हालविली."

"माझ्या या दारामधी तुळशीबाईच लावी रोप
तुळशीबाईचे नाव घेता गेली विघ्न आपोआप
माझ्या या दारानधी तुळशीबाईला घाली पाणी

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

तुळशीबाईच नाव घेता झाली विघ्नाची धुळदाणी

माझ्या या अंगणात तुळशीबाईला लावी हळदी कुंकू

तुळशीबाईचं नाव घेता गेली विघ्न सुखासुखू

माझ्या या अंगणात तुळशीबाईला लावी बुक्का

तुळशीबाईचं नाव घेता तुका वैकुंठी गेला सखा."

कुलदैवतांचे वर्णन करणारी स्त्री, विठ्ठल, राम, सिता इ. विषयी ओव्या गाणारी स्त्री, दिवाळी, नागपंचमी, दसरा, संक्रांत, तुळस,एकादशी याबद्दल मनोभावे ओव्या गाणारी स्त्री, लोणंद परिसरात आढळते. या सर्व देवदेवतांना त्या मानवी रूप देऊन टाकतात.

"विठ्ठल विटेवर नामदेव धक्याला

हुती गर्दी देव कुंडलीक सख्याला"

"रूक्मिण धुण धुती देवा विठ्ठला तुझी बंडी

जनाबाई बोल साधुसंताची आली दिंडी"

"भिउबाईची जत्रा देव धुळोबा लोटली,

चैताच्या महिन्यात बहिण भावाला भेटली"

"दिवाळीची चोळी भाऊबिजेचे लुगडे

हाक माझा बंधुराया तुझ्याकड"

लोणंद परिसरातील धनगर स्त्रियांनी जे आपल्या जीवनाचे आदर्श मानले, अंगीकारले तेच आदर्श तेथील पुरूषांनीही स्विकारले. त्यामुळे त्याच भावना त्याच्या मुखातून, ओव्यांतून प्रकट झाल्या.

लोकसाहित्याचा मूळ गाभा "भक्तिभाव" हाच आहे. त्यामुळे मानवसृष्टी, निसर्गसृष्टी, देवसृष्टीबद्दलचे भक्तीभाव लोकगीतातून जसे प्रकट झाले तसे धनगरी स्त्रियांच्या मुखातून झरलेल्या ओव्यातून प्रगट झाले आहेत. श्रीकृष्ण आणि राधेबद्दल मराठी मनाला विलक्षण प्रेम व आकर्षण आहे. धनगर स्त्री देखील आपले मराठी मन ओवीतून व्यक्त करते. धनगर स्त्रियांनी

श्रीकृष्णाच्या, राधेच्या अनेक लीलांची वर्णने आपल्या ओवीतून व्यक्त केली आहेत.

"सकाळी उठुनि हात दाराच्या भाईला
तुळशीच्या वटयावर कृष्णा रांगत पाहिला"

" सकाळी उठुनि चला दळण दळायाला
तुळशीच्या वटयावरी आला गोविंद खेळायला "

श्रीकृष्ण गोकुळात जन्मला पण त्याच्या जन्माचा आनंद गोकुळात आणि देशभरही वाऱ्यासारखा पसरला आहे. आणि या आनंदाने परदेशही गाठला आहे ही आजची वस्तुस्थिती आहे. आजची पौर्वात्य व पाश्चात्य तरूणपिढी श्रीकृष्णाचा धावा करून "हरेकृष्ण" पंथात जाऊन श्रीकृष्णाचा धावा करतात व जीवनातील नैराश्य दुर करतात असे दिसून येते. मन:शांती मिळविण्यासाठी आजची नैराश्यवादी पिढी श्रीकृष्णाच्या सानिध्यात रहात असल्याचे दिसून येते. स्त्रियांना तर श्रीकृष्णाचे विलक्षण वेड असलेले आढळते. धनगर महिला त्याला अपवाद असणे शक्य नाही.

"सुपातले ओले गहू दळते हे कारणाला
कृष्णाचा जन्म झाला गोकुळ आष्टमीला."

युगानयुगे प्रत्येक वयोगटातील महिलेला श्रीकृष्णाचे आकर्षण आहे. या आकर्षणाला कधीही खंड पडलेला आढळत नाही. यावरून धनगर महिला असो अगर कोणत्याही जातीधर्माची महिला असो तिला श्रीकृष्णाचे आकर्षण आहे. श्रीकृष्णाने आपल्या बासरीने गोकुळ वेडे केले होते. गोपींना वेडे केले होते. धनगर समाजातील लोकांना तर वेणूचे अतिव वेड असते आणि धनगर महिलांना वेणूच्या सूराचे आकर्षण असते. मेंढयाच्या कळपामागे धनगर वेणू, बासरी वाजवून निसर्गाशी नाते जोडतो आणि श्रीकृष्णाला हृदयात स्थान देतो. असा श्रीकृष्णाच्या भक्तीचा महिमा लोकगीतातून प्रकर्षाने जाणवतो. मराठी लोकसाहित्यात श्रीकृष्णावर बहुसंख्य गाणी आढळतात. त्यात श्रीकृष्णाच्या बाललीला, चोरून लोणी खाणे, दहीदूध खाणे, गोपींची मडकी फोडणे, खोडया काढणे इ. चे वर्णन आढळते. धनगर समाज घरातील दुध-दुभते आवर्जुन मडक्यातच ठेवतात, तापवितात. ही एका दृष्टीने श्रीकृष्णाची अंतरीक ओढच आहे असे मी समजतो.

"बांधा उखळाला याला बांधा उखळाला
नंदाचा पोर याला बांधा उखळाला
घरात न कळत हरी हा शिरतो
दही दूध लोणी चोरूनी खातो
सोडू नका याला, आता बांधा उखळाला
नंदाचा पोर याला बांधा उखळाला"

लोकगीतातून राधाकृष्णाची जोडी अमर झाली आहे. सुदामा अमर झाला आहे. या वर्णनातून पूर्वीचे गरीब, श्रीमंत वर्ग पूर्वी होते व आजही आहेत. या गोष्टींची जाणीव होते. खरा मित्र ही कल्पना पूर्वीपासून आजपर्यंत चालत आलेली आढळते. लोकगीतातून त्याची वर्णने आली आहेत. राजा व प्रजा भेद अजूनही आहे. लोकसाहित्यात फुगडी, झिम्मा, हेराफेरी याचे वर्णन येते. त्यामध्ये समाजजीवनाचे चित्र रेखाटले गेलेले आहे. हे मानवी जीवनाचे प्रत्ययकारी चित्र आहे.

लोकसाहित्य आणि पर्यायाने लोकगीतात श्रीकृष्ण द्रौपदीच्या गीतातून बंधूभगीनीचे प्रेम आले आहे. ते आजच्या 21 व्या शतकाकडे वाटचाल करणाऱ्या युगाला सूचक व मार्गदर्शक आहे. श्रीकृष्णाने द्रौपदीचे लज्जारक्षण केले. दुर्योधनाने द्रौपदीचे वस्त्राहरण केले व आजही समाजात असे घडत आहे. लोकसाहित्यातील गीताने व पर्यायाने धनगरी गीताने याचीही वर्णने केली आहेत. युगानुयुगे भाऊ हा बहिणीचा पाठीराखा आहे हे भाव व्यक्त करून लोकगीतांनी समाजाला मार्गदर्शन केले आहे.

आजच्या सामाजिक चित्रपटातून तरूण मुलींना फसविण्याची चित्रणे व त्यांना वाचविणाऱ्या व दुष्टाला मारणाऱ्या श्रीकृष्णाची चित्रणे आढळतात. अशी श्रीकृष्णाची कितीतरी गाणी लोकगीतांच्या भांडारात भरून राहिली आहेत. विस्तारभयास्तव अधिक उदाहरणे देणे अशक्य आहे. भोळयाभाबडया मराठी मनाला लोकगीतांचे आजही आकर्षण आहे हेच येथे मला आवर्जुन सांगावयाचे आहे. काळाच्या ओघात त्या त्या व्यक्तीच्या कंठात दाटून राहिलेली गीते संकलित करून ती

प्रकाशित करण्याचा माझा हा प्रयत्न आहे.

लोकसाहित्यात गोंधळाची गाणी, वारूळाची गाणी, मल्हारी-म्हाळसाची गाणी, धनगराची गाणी, लग्नाची गाणी इ. ची गाणी आढळतात. समाजातील ही माणसे अनादीकाळापासून हे जीवन जगत आले आहेत व असे जीवन जगण्यात त्यांना आनंद वाटतो हेही येथे सिध्द झाले आहे. लोणंद परिसरातील भक्तगण देवादिकांची गाणी जतन करीत आलेला आहे. ही भक्तमंडळी नित्यनेमाने, देवादिकांची पूजा बांधतात, गाणी गात असतात. या गाण्याची रचना साधी, सोपी, सुरावट, सहज सुंदर असते. खेडोपाडी, शहरातून आजही अंधश्रध्दा निर्मुलनाच्या चळवळी होत असल्या तरी नवविवाहितांचा संसार सुखाचा व्हावा म्हणून पूर्वपरंपरेने चालत आलेल्या गोंधळ घालणे, सत्यनारायण पूजा करणे, जागरण घालणे या सारख्या प्रथा घरोघर होत असल्याच्या आढळतात. उदा. मल्हारी-मार्तंडाचे गाणे, बिरदेवाचे गाणे इ.

"गड जेजुरीला चला जाऊ या
आता धनी म्हाळसाकांत डोळा पाहु या
बेल दवणा भांडार वाहू शिरी
देवा तुझ्यावीण कोण नित्य तारी
आम्ही हीन दिन तारी तू दयाळा
आलो शरण तुम्हा करा प्रतिपाळा
उभे दरबारी देवा तुझ्याविण नित्य कोण तारी."

गणपती उत्सवाला शंभर वर्षे होवून गेली तरी आजही गणपती उत्सव उत्साहाने साजरे होताना आढळतात. लोकसाहित्यातून आपल्या सांस्कृतिक जीवनाचे असे दर्शन घडते. पूर्वीचे सांस्कृतिक जीवन आणि आजचे सांस्कृतिक जीवन यात जमीन अस्मानाचे अंतर पडत असले तरी लोकसंस्कृतीचा प्रभाव कमी झालेला नाही. समाजातील सर्व स्तरांमध्ये या लोकसंस्कृतीचा प्रभाव टिकून आहे. उदा. पूर्वी इतकाच आजही तमाशा लोकप्रिय आहे. व हा तमाशा लोककलेचाच

आविष्कार असून तो सुशिक्षितांनाही प्रिय आहे. आजही कुटुंबातील स्त्रिया विवाह सोहळे, लग्न, मुंजी, बारसे, डोहाळे वगैरे समारंभ गाणी गावून करताना आढळतात. त्यामुळे मुलांच्यावर विशिष्ट संस्कार घडतात व भावी काळात तेच वळण घेऊन मुले आयुष्याची वाटचाल करतात व या सांस्कृतिक जीवनामुळेच भावनांचा विकास घडत असतो. देशाची संस्कृती घडते. मन व आरोग्य सुदृढ बनते व देशाचे वैभव वाढते. मराठी साहित्यातील लोकगीतांनी व पर्यायाने धनगरी गीतांनी देशाच्या वैभवात भरच टाकलेली आहे असे मला वाटते. ही लोकगीते गाणाऱ्यांना व ऐकणाऱ्यांना जीवनातील उच्च प्रकारचा आनंद मिळवून देतात असा आजपर्यंतचा अनुभव आहे. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हा सांस्कृतिक वारसा जात असतो व मानवी जीवनाला एक आगळावेगळा आनंद प्राप्त करून देत असतो. या सांस्कृतिक वारसाचे जतन रोजच्या दैनंदिन राहण्यात केलेले असते. व त्याला एक प्रकारचे आगळे–वेगळे सौंदर्य लाभलेले असते व भावभावनांनी जीवन समृध्द बनते. सहज जीवनाचा आस्वाद घेता येतो व समाजजीवनाला ही सौंदर्य प्राप्त होते. उदा.लग्नात, मुंजीत, बारशात पतीचे नाव घेताना सुहासिनीने लाजणे, आडपडदयाने नाव घेणे इ.

लोणंद परिसरातील लोकगीतातून सातारा जिल्हयातील सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडते. विशेषतः कृषिगीते, विधीगीते, डोहाळे, जन्म, पाळणे, लग्नसमारंभ या संदर्भात गायीलेल्या लोकगीतातून तसेच लोकसंस्कृतीचेदर्शन घडते. समाजजीवनाचेही दर्शन घडते. त्यामुळे समाजजीवनातील मैत्री चतुराई, शहाणपण, युक्तीवाद या वैशिष्टयांत हेच समाजजीवन कसे दडलेले आहे हे कळते. या परिसरातील सण, समारंभ, वृत्ते, राजकारणातील गीते या संदर्भात गायल्या जाणाऱ्या गीतातून येथील ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक परिस्थितीचे प्रत्ययकारी दर्शन घडते. अशाप्रकारे लोकगीतातून व्यक्त झालेला सांस्कृतिक वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंत कसा चालू राहिलेला आहे हे ही लक्षात येते. जुन्या शब्दाबरोबर नव्या शब्दांची पडणारी भर, लोप पावू लागलेले जुने शब्द, काही बदललेले तपशिल या लोकगीतातून जाणवत असले तरीही त्यांचा मूळ गाभा अभंग असल्याचीच प्रकर्षाने जाणीव होते.

समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून धनगरी लोकगीतांचा अभ्यास करताना एक गोष्ट आवर्जून लक्षात येते ती म्हणजे लोकसाहित्य हे समाजजीवनाच्या कृतीतून आणि ऊक्तीतून प्रकट झालेले आढळते. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून लोकगीतांचा विचार केला तर सर्व लोकगीतांचा कृती–उक्तीशी घनिष्ठ संबंध आहे. लोकगीतांच्या संदर्भात कृती आणि उक्ती या अभिन्न आहेत. हेच येथे जाणवते. लोणंद परिसरातील समाज जीवनाचे चित्रण करणाऱ्या लोकगीतांचा अभ्यास समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून करणे उचित ठरते. समाज जीवनातील कृती–उक्तींचा विचार लक्षात न घेता हा अभ्यास अपुरा ठरतो.

पारंपारिक लोकजीवनात लोकवाङ्.मय हे एक अविभाज्य अंग आहे. लोकवाङ्.मयाची निर्मिती, त्याची जडणघडण व त्यचे जतन लोकजीवनातच होत असते व एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे लोकवाङ्.मयाचा अमोल ठेवा त्यामुळेच होऊ शकतो असा निष्कर्ष काढणेच योग्य ठरते.

ब) <u>खंडाळा तालुक्यातील लोणंद परिसरातील धनगरी लोकगीतांच्या विविध आविष्काराचे वाङ्.मयीन विवेचन</u> :–

अलिकडे लोकसाहित्याचे महत्व नामवंत मराठी विचारवंतांना व अभ्यासकांना समजलेले आहे. त्यामुळे लोकसाहित्याचा अभ्यास आवर्जुन होऊ लागला आहे. अनेक विचारवंतांनी व अभ्यासकांनी लोकसाहित्याच्या अभ्यासासाठी आपले आयुष्य खर्ची घातले आहे. भोवतालचे जीवन व संस्कृतीचा चालत आलेल वारसा समजून घेण्यासाठी लोकसाहित्याची आज अत्यंत गरज भासू लागली आहे. "लोकसाहित्य ही प्रामुख्याने मौखिक स्वरूपात सादर केली जाणारी आणि सामूहिक आविष्कार करणारी प्रयोगात्मक कला आहे." असे मत गंगाधर मोरजे[6] यांनी व्यक्त केले आहे. आपले जीवन, आपली संस्कृती, आपल्या परंपरा समजून घेण्यासाठी तसेच आपल्या लोककला, आपले रूढी–रिवाज, आपले साहित्य याच्या पुनर्निर्मितीसाठी लोकसाहित्याची व त्याच्या अभ्यासाची आज अत्यंत गरज आहे. आणि म्हणूनच सातारा जिल्हयातील खंडाळा तालुक्यातील लोणंद परिसरातील लोकसाहित्याचा वेविध अंगाने अभ्यास करण्याचे या प्रकरणाचे प्रयोजन आहे.

सातारा जिल्हयाचे महत्व अनेक कवींनी गायले आहे.

"राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा ।
नाजूक देशा, कोमल देशा, फुलांच्याही देशा ।।
शाहिरांच्या देशा, कर्त्यामर्दांच्या देशा."

असे कवी गोविंदाग्रज वर्णन करतात. सातारा जिल्हयाच्या ऐतिहासिक, भौगोलिक सामाजिक, सांस्कृतिक या पार्श्वभूमीवर खंडाळा तालुका विराजमान झाला आहे. पराक्रम, शौर्य विरत्व आणि वैराग्य, स्वाभिमान, उदात्तता हे सातारा जिल्हयाच्या माणसाचे गुण त्याच प्रकारच्या निसर्गाच्या सानिध्यात या जिल्हयातील प्रत्येक तालुक्याच्या माणसात रोमारोमात भिनलेले आहे वर्तमानाची पाळेमुळे भूतकाळात खोलवर रूतुन भविष्याकडे झेप घेणारी मर्दानी वृत्ती हा सातारा जिल्हयाच्या मातीचा मोठा गुण आहे. तो लोणंदमधील माणसात व धनगरांच्यात देखिल खोलवर रूजलेला आहे. ही सर्व वैशिष्टये जाणून घेण्यासाठी या भूमीवरील लोकसाहित्याचा अभ्यास मी करीत आहे. कारण या अभ्यासाची सद्या फार आवश्यकता आहे.

"लाल पहाट कोंबडा आरवला
स्वातंत्र्यासाठी सातारा गरजला"
"सूर्य तळपतो आकाशी
वीर तळपतो साताऱ्याशी
धनगर तळपतो खंडाळयाशी"

या ओवीत साताऱ्याचे व परिसराचे तेज गाणारी महिला आजही लोणंद परिसरात आढळते. सातारा जिल्हयातील लोकमानस साताऱ्याच्या मातीशी एकजीव झालेले आहे. सातारा जिल्हयातील व लोणंद परिसरातील लोकगीतांचा विचार केला तर ओव्या, अंगाई गीते, संस्कार गीते, सण, समारंभ, विवाह, जन्म इ. वरील गीते, कथागीते देवदेवतावरील गीते, आख्यान गीते, क्रिडागीते, पाळणागीते इ. चा समावेश करता येतो. त्यामध्ये पुरूषगीते, स्त्रीगीते, बालगीते यांचा एक भाग केला तर दुसरा भाग लोणंद परिसरातील धार्मिक कुलाचार म्हणजेच देवदेवता,

सण, वृत्ते इ. वरील लोकगीते असा होईल आणि तिसरा भाग खंडाळा तालुक्यातील धनगर लोकगीतातील निवडक देवदेवतांच्या कथा उदा.खंडोबा, बिरोबा, म्हस्कोबा, वाग्देव इ.असा करणे सोईचा ठरेल.

1) **पुरूषगीते** :-

धनगरी ओव्यांमध्ये पुरूषगीतांचा वाटा फार मोठा आहे. पुरूषगीतामध्ये गजनृत्याला फार महत्व आहे. पुरूषगीते ही लोकमनोरंजन, लोकशिक्षण यासाठी सादर केली जातात. या गीतात नृत्य, नाच, हावभाव, याला फार महत्व असते. पुरूषगीतात सुरवंता बिरदेवाची ओवी एक प्रसिध्द ओवी समजली जाते. तिला एक वेगळे महत्व धनगरी पुरूषगीतात आहे.

पुरूषगीतातही खालील प्रकारे वर्गीकरण करता येईल.

1. गजनृत्यावेळची गीते.
2. भाकणूकीवेळची गीते.
3. संध्याकाळचे गीत.
4. देवांची गीते.
5. यात्राविषयक गीते.
6. पोवाडे, लावणी गीते इ.

धनगर समाजामध्ये "सुंबरानं मांडीलं, सुंबरानं मांडीलं" हे काव्य म्हणजे सर्व देवांना आळवणी करणे व मगच कोणत्याही गीताला सुरवात करणे अशी प्रथा आहे. प्रत्येक गीतप्रकाराची सुरवात "सुंबरानं मांडीलं" या गीताने होते. खंडोबा, बिरोबा, म्हस्कोबा, डोंगरचा हरी, वाग्देव इ. देवांना धनगर प्राणप्रिय मानतात. "आम्ही तुला शरण आलो" अशी प्रार्थना करून गीताला सुरवात करतात मग ते गीत कोणतेही असो, धनगर समाजातील पुरूष या गीताने आपल्या कोणत्याही प्रकारच्या कवनाला सुरवात करतो.

1) **गजनृत्यावेळची गीते** :–

महाराष्ट्रातील धनगर समाज एकेकाळी अनेक कलागुणांनी युक्त असलेला समाज तसेच समृध्द जीवन जगणारा समाज समजला जात होता. उदा.धनगरांनी जोपासलेली गजनृत्य कला. ही एक आगळीवेगळी नृत्यकला पूर्वीपासून आजपर्यंत अस्तित्वात आहे. गजनृत्यकला ही एक उत्कृष्ठ नृत्यकला म्हणून आजही 26 जानेवारी या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने दिल्लीच्या राष्ट्रीय कार्यक्रमात सादर केली जाते. ग्रामीण भागात सणावाराला, लग्नसमारंभाच्यावेळी, यात्रांच्या वेळी धनगर पुरूष मंडळी गजनृत्य करतात.

आजकाल होणारी गजनृत्य पाहिली की या नृत्यकलेबाबत आपले मत विपरीत बनते असे खेदाने आणा डांगे[7] म्हणतात व गजनृत्याचे खरे स्वरूप जनतेसमोर सादर होण्याची आवश्यकता आहे असे ते सांगतात.

गजनृत्याच्या गीतात नृत्यनाच फार महत्वाचा असतो. शरीराच्या योग्य हालचालीवर हे नृत्य अवलंबून असते.

गजनृत्य = गज + नृत्य

गजांनी केलेले नृत्य म्हणजे गजनृत्य होय. गजनृत्य हे शिस्तीने, शांतपणे, हळुवार करायचे असते. गज म्हणजे हत्ती. हत्तीसारखे नृत्य म्हणजे गजनृत्य होय. हत्ती हा शांतपणे पाय उचलतो, ठेवतो तसे गजनृत्यात असते. म्हणून हत्ती गज नृत्य गजनृत्य होय . पुढे गज म्हणजे पुरूष म्हणजेच "गजीघाई" हा शब्द रूढ झाला. आजही गजनृत्याला "गजीघाई"च म्हणतात. गलीघाई म्हणजे गजांची घाई.

हत्तीनृत्य गजनृत्य गजीघाई असा यात बदल होत गेला. गजनृत्यात वेशभूषेला अत्यंत महत्व आहे. गुडघ्याच्या वर नेसलेले धोतर, अंगात कोपरी, मनगटात कडे, खांद्यावर कांबळ, डोक्याला तांबडं मुंडास (पटका), हातात रूमाल अन गळयात गंडा–दोरा बरोबर डिमडी, ढोल, झांज, काठी इ. नृत्य चालू असताना अधूनमधून देवाचे नाव घेऊन कपाळाला भंडारा लावला जातो.

"खंडोबाच्या नावान चांगभल
बिरदेवाच्या नावान चांगभल
डोंगरच्या हरीच चांगभल
वाग्देवाच्या नावानं चांगभल."

असा सतत देवांच्या नावाचा जयघोष नृत्य, नाच चालू असताना केला जातो. गजनृत्यामध्ये अनेक घाया लावल्या जातात. त्यामध्ये गाठीची, भेटीची, नमस्काराची, गजी इ. घाया महत्वपूर्ण मानल्या जातात. अशा घायांच्यायात्रावेळी मोठया स्पर्धा होतात. त्यामध्ये वडजाई, वाग्देव, बिरोबा या देवांच्या ठिकाणी आजही स्पर्धात्मक कार्यक्रम होतात. प्रत्येक घाईत 20/25 माणसे असतात. सर्वजण एकसारखे नाचतात. एकमेकाला भेटतात. गजनृत्यात एका जागेवर गोल फिरून उडी मारण्याला जास्त महत्व असते. हे नृत्य करीत असताना दोन्ही हात वरती धरले जातात. एकंदर एक मनुष्य पुढ म्हणत असतो. बाकीचे जोडीदार मागे म्हणतात.

धनगरांच्या गजनृत्यगीतातून धनगर समाजाच्या आचार विचारांचे, चालरितींचे, श्रध्दास्थानाचे, परमेश्वर भक्तीचे, अपत्य प्राप्तीचे अनेक संदर्भ समजून येतात. धनगराच्या मल्हारी देवाचा उल्लेख करताना त्याचा ऊर भरून येतो. ज्या देवाने या समाजाला हा व्यवसाय म्हणून दिला त्याचा तो स्वाभिमानाने उल्लेख करतो. मल्हारी देवाने धनगराच्या पोटापाण्यासाठी, जगण्यासाठी मेंढपाळी करायला लावली म्हणून त्या शेळयामेंढयासाठी तो रानोमाळ हिंडतो. आयुष्यभर भ्रमंती करतो. शेळयामेंढयांच्या चाऱ्यासाठी तो बाभळीचा झाडपाला झाडतो. या सर्व मार्गात त्याला ऊन,वारा,पाऊस याला तोंड द्यावे लागते. माळरान तुडवावे लागते. त्याच्या जीवनाला स्थैर्य नसते. तरीसुध्दा तो अशा अस्थिर भ्रमंती जीवनाची उपेक्षा करीत नाही. त्याची अढळ श्रध्दा असते की हा व्यवसाय हे भटके जीवन त्या मल्हारी देवानेच आपल्याला दिले आहे. याचा आपण स्विकार केला पाहिजे आणि शेळयामेंढयांच्या आधारावर आपण जगतो त्या शेळयामेंढयांना आपण जगविले पाहिजे असे तो निष्ठेने म्हणतो व त्याच निष्ठेने वागतो. म्हणून मला वाटते की धनगर समाज हा साधाभोळा, श्रध्दाळू व जीवनावर प्रेम करणारा आहे. आधुनिक

काळात यंत्रयुगात व वैज्ञानिक काळात जीवन जगण्याच्या अनेक सुविधा निर्माण झालेल्या असल्या तरी परमेश्वराने घालून दिलेला जोवनाचा मार्ग या समाजाने सोडलेला नाही हे खडतर जीवन जगत असताना कितीही कष्ट पडले तरी तो आपल्या शेळयामेंढयांना जिवापाड जपतो व त्यांनाच आपली मुलेबाळे मानतो. म्हणून मला असे म्हणावेसे वाटते की, धनगर समाजाच्या जीवनविषयक निष्ठा आजतागायत यत्किंचितही ढळलेल्या नाहीत. आधुनिक युगाच्या वाटचालीत कितीही प्रलोभने झाली तरी त्या प्रलोभनाला हा समाज बळी पडलेला नाही. धनगराच्या बरोबर असलेल्या काळयाकुत्र्याचे सहकार्यही तो विसरत नाही. मेंढयाच्या बरोबर असणारा काळा कुत्रा त्याचा सहकारी असतो व त्याला लागणारे अन्नही तो आनंदाने पुरवितो. शेळयामेंढयांचे संरक्षण करणारा काळा कुत्रा आपला सहाध्यायी आहे असे तो मानतो.

"निंबोडी गावचा धनगर राजा
काळा कुत्रा त्याचा सेनार पति
खायला लागती पन्नास भाकरी
ईळभर तो मेंढयाभोवती."

देवाला नवस करून पोटपाणी पिकण्यासाठी मेंढा बळी देण्याची प्रथाही तो पाळतो. जेजूरीला जाणे, गोंधळ घालणे, ढोल झांजावर गजनृत्य करणे, नाच करणे हे सारे तो नवस फेडण्यासाठी करीत असतो. आजच्या कल्पनेप्रमाणे कुटुंब कल्याणासाठी एक दोन मुलांचीच अपेक्षा धरण्याची कल्पना त्याच्या ठिकाणी नव्हती. यावरून पूर्वीचा धनगर समाज कितीही मुलमुली झाली तरी त्याचा योग्य सांभाळ करीत होते याचाही उल्लेख अनेक पुरूषगीतातून आढळतो. उदा.

"निंबोडी गावच्या धनगर राजान
पोराच्या पायी नवस केला
पोर झाली बारा पोरी झाल्या तेरा
कबऱ्या केसाचा मेंढा कापीला."

मल्हारी देवाला तो धन, धान्य, संपत्ती, मुलेबाळे, शेळयामेंढया यांना लागणारा चारापाणी, बाभळी, बाभळीच्या भरघोस शेंगा मिळावे यासाठी प्रार्थना करतो. या लोकगीतामध्ये धनगराचे सारे जीवन जसेच्या तसे दिग्दर्शित झाले आहे. या गाण्यातून कल्पकता, घटना प्रसंगाचे औचीत्य जसे आकर्षक आहे तशी त्याची अभिव्यक्ती स्वाभाविक आहे आणि म्हणूनच कितीही काळाचा ओघ लोटला तरीही ही लोकगीते अभंग आहेत. अशी कितीतरी गाणी खेडोपाडी लोकांच्या मुखात, स्त्री पुरूषांच्या कंठात एक जीव झालेली आहेत. त्या गाण्यांना मी येथे संकलन करून अक्षररूप दिले व त्यातून वास्तव जोवनाचे संदर्भ गोळा केले. त्यासाठीच धनगरी लोकगीतांचे महत्व आहे.

2) **भाकणुकीवेळची गीते** :-

आजच्या काळात धनगरी ओव्यात भाकणुकीला विशेष महत्व आहे. यात्रेत हा कार्यक्रम असतो. गजनृत्य संपल्यानंतर भाकणूकीचा कार्यक्रम सुरू होतो. भाकणूक म्हणजे पुढील वर्षाचे अंदाजे भविष्य सांगणे असा प्रचलीत अर्थ आहे.

भाकणूक सांगणारी एक व्यक्ती असते. त्यांच्या अंगात येते. तो उघडा असून कमरेला फक्त धोतर असते. हातात काठी, चाबुक असतो. त्याच्या गळयात फुलांची, पैसाची माळ असते आणि खांद्यावर घोंगडी असते. त्याच्या फोटो वरून वेशभूषेची कल्पना येईल.

तो आपल्या अंगात आल्यानंतर देवाची यात्रा कशी काय झाली ते सांगतो. आणि पुढच्या वर्षाचे भविष्य आधी सांगतो. तो आपल्या गीतातून सांगत असतो की,

"रूपया गाडीच्या चाकाएवढा होईल,
जुन्या फणावर पेरील तो पोटभर खाईल,
शेळी मेंढी खडकावर पाणी पेईल
माणूस माणसाला खाईल,
जनावरांचे हाल होतील,

भावाभावात भांडण होतीलं

शेती भाती भरपूर पिकल

आई बापाला पोरग विसरल

रोगराई पसरेल दुष्काळ पेईल

ज्वारीच पीक सोळा आणे

बाजरीच पीक शंभर नंबरी"

भाकणूककार पाऊस, शेळीमेंढी, जनावरे, स्वस्ताई, महागाई, रोगराई, पीकपाणी, दुष्काळ अशा अनेक प्रकारचे भविष्य तो भाकणूकीतून सांगत असतो. धनगर लोक तो सांगत असताना काळजीपूर्वक ऐकतात आणि इतर लोकांना सांगतात. यावरून पूर्वी व आजही लोकांचा भविष्यावर विश्वास आहे याची कल्पना येते. विज्ञान युगात 21 व्या शतकाकडे वाटचाल चालू असताना राशीभविष्य, वृत्तपत्रे, मासिके, नियतकालिके यावर भर देताना लोक आढळतात. धनगर समाज ही त्याला अपवाद नाही.

3) <u>संध्याकाळची गीते</u> :-

श्रमपरिहारासाठी गीते महाराष्ट्रात विशेषतः ग्रामीण भागात आजही लोकप्रिय आहेत. उदा. "भलरी भल गडया दादा भलरी" धनगर समाजही दिवसभर केलेल्य कष्टाचा श्रमपरिहार म्हणून अशी गीते गातो. त्यांना संध्याकाळची गीते म्हणून संबोधले जाते.

संध्याकाळी मेंढया वाडयात, शेतात, माळावर बसविल्यानंतर ही गीते म्हणतात. यावेळी धनगर लोक परमेश्वराला प्रार्थना करून सर्व सुखी ठेवण्याची विनंती करतात. त्यामुळे यात देवांची गाणीही येतात. तसेच काही मनोरंजक गाणी येतात. संध्याकाळच्या वेळेला तो तळाव ओव्या, सुंबरान म्हणत असतो. या ओव्या एक व्यक्ती पुढे म्हणते तर इतर त्याला साथ देतात. दोघेजण ढोल व झांज वाजवून म्हणत असतात. या ओव्या म्हणताना ते घाईत म्हणतात. ढोल व झांज ही वाद्येही घाईत जोरात वाजवतात. या गीतात "सुंबराल मांडील, सुंबरान मांडील" या गीताला प्राधान्य असतेच.

"सुंबरान मांडील सुंबरान मांडील

भोळया माझ्या शंकराच

पारबत्या देवीच

कैलासाच्या पर्वताच

सुंबरान मांडील आता सुंबरान मांडील"

अशाप्रकारे अनेक मनोरंजक गीते संध्याकाळी हे लोक म्हणत असतात व त्यात मनोभावे तल्लीन होत असतात.

4) **देवांची गीते** :-

महाराष्ट्रातील धनगर समाज हा श्रध्दावंत असा भोळा समाज आहे. त्याची आपल्या कुलदैवतावर अपार श्रध्दा व भक्ती आहे. या आपल्या कुलदैवतांना संतुष्ट करण्यासाठी अनेक गीते म्हणून त्याची आळवणी करतात. देवतावर आधारीत ते ओव्या गीते म्हणत असतात.

आमचा देव हा सर्वात मोठा आहे. तो आम्हाला कधीही कशाचे कमी पडू देत नाही. आम्ही चुकलो तर वेळप्रसंगी तो आमच्यावर कोपतो, रागावतो म्हणून त्याची मनोभावे भक्ती करायची असे या लोकांचे ब्रीद ठरलेले असते. म्हणून तो देवाला चांगभल म्हणतो तू सर्वांचे चांगले, भले करतोस तसे आमचे चांगले भले कर अशी विनवणी ते सतत देवाला करतात.

बिरोबा, खंडोबा ही धनगर समाजाची कुलदैवते आणि प्रमुख श्रध्दास्थाने होत. देवांच्या गीतात सुखंता बिरदेवाची ओंवी अतिशय प्रसिध्द आहे. त्याचप्रमाणे "चिलयाबाळाची ओवी" ही तितकीच महत्वाची मानली जाते. ती थोडक्यात अशी – "श्री शंकराच्या प्रसादाने चिलयाबाळाचा जन्म होतो . श्री शंकर चांगुणाचे सत्व घेण्यासाठी तिच्या घरी येतात व इच्छाभोजन मागतात. म्हणून चांगुणा आपल्या चिलयाबाळाला कापून त्याचे जेवण करून ती वाढते. चांगुणाच्या भक्तीवर श्री शंकर प्रसन्न होतात व चिलयाबाळ परत येतो." अशी रोमहर्षक कहाणी आहे. बिरदेव, विठ्ठलाच्याही ओव्या देवाच्या गीतात येतात. एकूण श्री शंकर, खंडोबा, विठ्ठल, बिरदेव इ. देवांच्या ओव्या या परिसरात गायल्या जातात.

5) **यात्राविषयक गीते** :-

आपले मित्र, सगेसोयरे यांना एकत्र आणण्याचे साधन म्हणजे या परिसरात होणाऱ्या यात्रा होय. अशा अनेक यात्रातून एकमेकांच्या भावना एकमेकांना सांगितल्या जातात. यात्रेत आजूबाजूचे सर्व लोक येतात. त्यामुळे त्यांच्या सुखदु:खांना उजाळा मिळतो.

यात्रेमध्ये त्यांचा मुक्तभाव, मुक्तकंठ असतो. ही गीते म्हणताना ती नाचून अत्यानंदाने म्हणत असतात. यात्रेची शोभा या गीतांमुळे वाढते हे निश्चित. खंडोबा, बिरोबा, वाग्देव, कडजाई, वडजाई इ. देवांच्या यात्रातून या परिसरातील सर्व घडामोडीवर आधारीत गीते म्हटली जातात.

धनगरी लोकांचे जीवन, त्यांना येणाऱ्या अडचणी त्या कशा सोडविल्या जातील याविषयी यात्रेमध्ये चर्चा होते. त्यासाठी परमेश्वराची भक्ती करणे हा मुख्य धागा असतो. यात्रेच्यावेळी प्रत्येक मनुष्य मला यात्रेला जायचे असे म्हणत असतो.

"मला बी जत्रला येऊ द्या
किर काठीन घोंगड घेऊ द्या की
गुर पाण्याव नेऊ द्या
किर मला बी जत्रला येऊ द्या
किर काठीन घोंगड घेऊ द्या की."

हे गीत या समाजात फार प्रचलीत आहे. याच गीताच्या चालीवर "भंडार खोबरे घेऊ द्या" हे गीत जेजूरीच्या खंडेरायाला जाण्यासाठी सर्वजण कसे धडपडत असतात हे दिसून येते. धनगर समाजास जेजूरीच्या यात्रेतल भंडार खोबर फार प्रिय आहे. भंडाऱ्याने माखलेली खोबरे, तुकडे ते प्रसाद म्हणून घरी आणतात व इतरांना देतात. कामाच्या रामरगाडयातून वेळ काढून जेजूरीच्या यात्रेहून जेव्हा तो परत येतो तेव्हा त्याच्या कुटुंबियांना त्याच्याबद्दल एक वेगळी आतुरता लागलेली असते. पेढे, चुरमुरे, रेवडया कुटुंबातील इतर माणसांना देताना त्याच्या घरात

एक वेगळे भक्तीमय वातावरण निर्माण होते. या भक्तीभावाने तो आपले आयुष्य कितीही संकटे, दु:खे, अडचणी आल्या तरी तो ते सोसतो. भावी जीवन सुखी करण्याचा त्याचा हा मार्ग असतो. धनगराच्या भोळयाभाबडया या भक्तीभावापुढे नतमस्तक व्हावेसे वाटते.

6) <u>पोवाडे</u> :–

महाराष्ट्रात पोवाडयाला एक वेगळी परंपरा आहे. शाहिरांनी, मर्दमराठयांनी आपला काळ पोवाडयांनी गाजविला होता. छ.शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा वारसा घेऊन लावणी व पोवाडयांनी महाराष्ट्र दुमदुमून निघालेला होता. पराक्रमाच्या जल्लोषाची ही गाणी आजही शिवशाही डोळयापुढे उभी करतात. बाबासाहेब पुरंदरे यांचे "जाणता राजा" सारखे नाटक आजही लोकप्रिय ठरते. यातच पोवाडयाचे महत्व लक्षात येते. पोवाडयांना लावणीने दिलेली साथ सर्वश्रुत आहे. पोवाडे व लावणी या लोकगीतांचे आकर्षण कमी न होता दिवसेंदिवस ते वाढत आहे. पोवाडे व लावणीच्या रूपाने लोकगीते व लोकनृत्य यांनी पूर्वीपासून आजतागायत जनमनाचा ठाव घेतलेला आहे. उदा. काळूबाळू तमाशा मंडळ, संगला बनसोडे, आमन तांबे, रघुवीर खेडकर इ. च्या लावणीने जीवनातील श्रृंगार टिपला आणि त्या श्रृंगाराच्या बळावर पोवाडयाने पराक्रम गाठला. या पराक्रमाची ओढ धनगरालाही आहे. कारण तो महाराष्ट्रातील एक घटक आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील लोकमनाचे दर्शन धनगराच्या कृती उक्तीतूनच घडणे स्वाभाविक आहे. धनगरही आवडीने पोवाडा गाताना आढळतात. उदा.शिवाजीचा पोवाडा, तानाजीचा पोवाडा, बाजीप्रभूचा पोवाडा, बाबू गेणूचा पोवाडा इ.

धनगर समाज हे पोवाडे गाऊन आपल्या महाराष्ट्राचा अभिमान व्यक्त करतो. पराक्रमाचा, इतिहासाचा वारसा तो स्वाभिमानाने गातो. पोवाडे हा त्याच्या आवडीचा विषय आहे. पोवाडे, लावणी तो मेंढरापाठीमागे जाताना, फिरताना गातो. तो श्रमपरिहारासाठी पोवाडे गातो. देशातील पराक्रम अभिमानाने पोवाडयाच्या रूपाने आळवितो. त्याला छ.शिवाजी महाराज, मल्हारराव होळकर यांचा पोवाडा याविषयी अभिमान आहे.

लोणंद परिसरातही काही धनगरी शाहीर होऊन गेले. त्यांनी मेंढयामागे, डोंगरावर, माळरानावर, वाडयावर अनेक पोवडयांची रचना केलेली आहे. या परिसरात नामदेवराव धायगुडे यांनी तयार केलेला पोवाडा आजही स्वातंत्र्यकाळ व क्रांतीकारकांचे साक्षात कर्तृत्वच उभे करतो आणि स्वराज्यशाहीची आठवण करून देतो.

ज्याची किर्ती साऱ्या जगतात । मृत्यू लोकात दख्खन देशात ।
महाशूर शिवाजी अवतरला । हिंदू धर्माच्या रक्षणाला ।।जीर जी जी।।
आसूरांनी मुलूख पिडीला मानीना कोणी देवाजीला ।
रूशीचा होम बंद पडला । न्याय नाही जगामधी उरला ।
माय वळखीना लेकराला । लागली चिंता महादेवाला ।
बसून विचार केला कैलासाला । दैत्याचा मोड करायला ।
अवतार शिवाजीचा झाला । जीर जी जी

गोर गरीबाचा कैवारी । राज अवतारी अस श्रीहरी ।
देशाचा तो पालणवाला । धावून किर येणार संकटाला ।
जसी काय माय लेकराला । तसा तो शिवबा धनी आपुला ।
वाघ दख्खनचा जागा झाला । कराव साह्य आपुन त्याला ।
भूलून वैऱ्याच्या संततीला । लाळ भित्याची घोटायला ।
लाज नाही कशी मुडदाराला । थु थु तुमच्या जीनगाणीला । जीर जी जी।

शिवबाची खरी बाहदरी । कोकन हेटकरी घेऊन बरोबरी ।
दिली त्यांना घोडी बसायला । शिलेदार करून बरोबरीला ।
घ्यावा म्हणे चाखनचा किल्ला । नरसाळे फिरंगोजी तिथला ।
गडकरी शूर लढणेवाला । शिवबान जगविला त्याला ।
बळविल किर तसल्या बहादराला । थू थू तुमच्या जिनगाणीला। जीर जी जी

फिरंगोजी मराठी गाजी । अकलेची भाजी सांग भजला ।
दास वैऱ्याचा कसा बनला । जात, धर्म, गोत बुडायला ।
गेल्या तरी कुठ तुमच्या अकला । ईरसलीला कुठ विसरला ।
द्या आयाबहिणी दुष्मनाला । लाज नाही मिशा बाळगायला ।
कुत्र्यावानी जलम काय असला । थु थु तुमच्या जिनगानीला । जीर जी जी

ज्याला नाही जातीची चाड । मुर्खाचा तो द्वाड ।
कुत्र खादाड । दृष्टाच्या जिनगानीला भुलला ।
कुळीला नकीत घालायला । कशापाई घ्यावा जन्म असला ।
सांगाव काय नि लाजऱ्याला । धरम कीर खास तूमचा बुडला ।
थू थू तुमच्या जिनगाणीला । जीर जी जी

शिवबाच्या पाई लागूनी । फिरंगोजी म्हणे आपल्यावाणी ।
आम्हाला गुरू नाही मिळला । ठाव हा धर्म कुणाचा कसला ।
वाघाचा बच्चा आसून त्याला । मेंढरामधी वाढविला
म्हणून जातीचा विसर पडला ।फिरून गड त्याने सारा दावीला ।
बोलून गड दीला शिवाजीला । भावपणा शिवाजीशी केला ।
नामदेव धायगुडे गाई पोवाडयाला । जीर जी जी ।।

अशा अनेक पोवाडयातून इतिहासकालीन शिवकाळाचे, पेशवेकाळाचे दर्शन घडते व तत्कालीन जीवनमान आचारविचार, राजकारण, राजकीय उलाढाल यांचा संदर्भ कळतो. अशी ही विविधतेने नटलेली पुरूषगीते आहेत.

2) <u>स्त्रीगीते</u> :-

लोकसाहित्यात लोकगीतांच्या संकलनाचा खूप मोठा साठा आढळतो. एवढेच काय पण लोकसाहित्यामध्ये लोकगीतांनाच प्रमुख स्थान दिले जाते. या लोकगीतांचा संबंध प्रामुख्याने स्त्रीवर्गाशी असतो. ही स्त्रीगीते स्मृती व स्मरणावर हवाला ठेवूनच या पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे

गेलेली आढळतात. या भावनांचा आविष्कार पद्यमय झालेला आढळतो. जात्याच्या घरघरीवर, झिम्म्याच्या फेरावर, फुगडीच्या टेक्यावर स्त्रीगीते बहरलेली असतात. स्वातंत्र्यचळवळीतील घडामोडी तसेच राजकीय वातावरणाचे पडसाद स्त्रीगीतातून प्रकर्षाने उमटलेले आहेत. लोणंद परिसरातील स्त्रीया ही लोकगीते गाताना आजही आढळतात.

स्त्रीगीतांची विविधता व विपुलता अधिक असल्यामुळे स्त्रीगीते म्हणजेच लोकगीते असाही समज रूढ होता. पुरूषांच्या लोकगीतांच्या तुलनेने स्त्रीगीते संख्येने विपुल व विषयाच्या दृष्टीने विविध असून अधिक आहेत. स्त्रियांनी या गीतांचा अमोल ठेवा प्राचीन काळापासून आजतागायत सांभाळून ठेवला आहे. ही सर्व स्त्रीगीते महाराष्ट्रीय स्त्रीच्या जीवनाचा खरा व जीवंत आविष्कार आहे. जीवनातील भलेबुरे अनुभव हळुवार अंत:करणाने महाराष्ट्रीयन स्त्रीने अतिशय सहजपणे, सुलभपणे मांडलेले असल्यामुळे जीवनानुभवांचा भावनिक परिणाम आजही बायकांच्यावर होताना आढळतो. ही सर्व स्त्रीगीते मनाला भुरळ पाडतात, चटका लावतात. या गीतांची प्रकृती आगळीवेगळी आहे. या संदर्भात साने गुरूजी[8] म्हणतात – "स्त्रियांनी आपला संपूर्ण आत्मा या गीतात ओतला आहे." तर कमलाबाई देशपांडे[9] स्त्रीगीतांना "अपौरूषेय वाड्.मय" म्हणजे "लोकवाड्.मय" असे म्हणतात. याठिकाणी स्त्रीगीते व पुरूषगीते यातील भेद कमलाबाईंनी लक्षात घेतलेला आहे. त्यांनी स्त्रीगीतांना अपौरूषेय वाड्.मय म्हटले असले तरी लोकवाड्.मयाला लोकवाड्.मय असे म्हणणे तितकेसे बरोबर वाटत नाही. याठिकाणी स्त्रीगीते व पुरूषगीते अशा दोन लोकगीतांचा संदर्भ लक्षात घेतला आहे. पुरूषगीते ही मराठी लोकवाड्.मयात लोकप्रिय झालेली आहेत. ही पुरूषगीते स्त्रीगीताइतकी भावनिक नसतात. परंतु त्यातून प्रकट होणारा रगेल व रंगेल भाव उत्स्फूर्त आनंदाचा आविष्कार घडवितो हे कबूल करावे लागेल. याठिकाणी मला प्रामुख्याने स्त्रीगीताचे स्वरूप विशेषाची चर्चा करावयाची आहे. "स्त्रियांनी निर्मिलेली, स्त्रीजीवनात प्रचलीत असलेली आणि स्त्रीमनाची प्रामुख्याने दर्शन घडविणारी आणि स्त्रीजीवनात स्थान असलेली लोकगीते म्हणजे स्त्रीगीते." अशी व्याख्या डॉ.शरद व्यव्हारे[10] करतात ती मला बरोबर वाटते. आजपर्यंत

प्रत्येक पिढीतील स्त्रियांनी स्त्रीगीतात आपआपल्या परीने भरच टाकलेली आढळते. त्यामुळे बदलत्या समाज जीवनाचे चित्र त्यात आपोआपच उमटलेले आहे.

स्त्रीगीते एकूण लोकसमूहातील स्त्री समूहाची निर्मिती असली तरी या स्त्रीगीताचे स्वरूप उत्स्फूर्त आहे. व जीवन जगत असताना जे अनुभवले, जे भावले तेच सुखदु:खाचे अनुभव त्यात प्रगट झाले आहेत. अंतरीक उमाळयातून ही स्त्रीगीते व्यक्त झालेली असल्यामुळे त्यातून एक आगळे वेगळे समाधान प्रगट झाले आहे. या समाधानापोटीच महाराष्ट्रीय स्त्रीयांनी आपल्या अंतकरणात दाटून आलेले भाव आपल्या गीतातून प्रगट केले. या कारणामुळे या गीतांची निर्मिती अधिक प्रमाणात होवू शकली. स्त्री जीवनात या गीतांना महत्वाचे स्थान प्राप्त झाले व ही गीते आजपर्यंत टिकून राहिली. या स्त्रीगीतातून स्त्री जीवनाच्या आवडी–निवडी, भावभावना, त्यांचे आचारविचार, रूढी, प्रथा, तिच्या मनातील खळबळ, उमाळा चित्रित झाला आहे. स्त्री जीवनातील अनेक हृदयस्पर्शी चित्रण त्यात आढळते. या स्त्रीगीतामुळे जीवनाकडे पाहण्याचा स्त्रीचा दृष्टीकोन, जीवन जगताना तिने जोपासलेली जीवनमूल्ये आपल्याला कळतात. थोडक्यात म्हणजे ही स्त्रीगीते महाराष्ट्रीय स्त्रीची भावगंगा असून महाराष्ट्रीय स्त्रीची गाथाच त्यात गोवली गेलेली आहे. असेच त्यात दिसून येते. स्त्रीगीतातील ही ओवी वाचली तरी त्याचा प्रत्यय येतो. उदा.

"लेकीचा जन्म् जन्म घालुन चुकला
बैल घाण्याला जुपला, जन्मवेरी"

तात्पर्य लोकगीते आणि स्त्री यांचे परस्परसंबंध अतुट संबंधाचे नाते आहे. हे ही येथे नमूद करावेसे वाटते. स्त्री ही धार्मिक व भाविक वृत्तीची असल्यामुळे विधी, सण, उत्सव, उपासना, कुलाचार या संदर्भात चालत आलेल्या परंपरा ती सांभाळत असते. मराठी लोकजीवनात काही विधीच्या प्रसंगी गाणी म्हणण्याची प्रथा आहे. त्यामुळे स्त्रियांच्या विधी गीतांना गाण्याची जोड मिळालेली आहे. अशाप्रकारे ही स्त्रीगीते विधीशी निगडीत असल्यामुळे लोकगीते जीवंत राहिली आहेत असे म्हणावे लागेल. ही गीते स्त्री जीवनाचा अविभाज्य घटक झाली आहेत. स्त्रियांनी निर्माण

केलेली त्यांच्याच जीवनात प्रचलीत असलेली आणि त्यांनीच जतन केलेली व त्यांनीच मौखिक परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे स्वाधीन केलेली ही स्त्रीगीते लोकवाङ्‌मयाचा अमुल्य ठेवा आहे. या लोकगीतांचा आविष्कार जेवढा गोड तितकाच हृदयाला स्पर्श करून जाणारा आहे. हे पुढील गीताच्या रसास्वादावरून सहज लक्षात येईल.

स्त्रीजीवनाचे भावविश्व विविध छटांनी नटलेले आहे. त्यात कधी हळवे मन, कधी सुखदु:ख, दैनंदिन जीवनातील घटना, त्यातील अनुभव, कौटुंबिक नाती, सभोवतालचा परिसर आणि संस्कार तिच्या मनपटलावर उमटणे साहजिकच आहे. शहरी स्त्रीजीवनापेक्षा ग्रामीण स्त्रीजीवन फार आगळे वेगळे आहे. या स्त्रीजीवनात पावित्र्य, मांगल्य आणि श्रध्दा यांना विशेष महत्व आहे. या मूल्यावर ती जीवापाड प्रेम करते. देवाधर्मावर तर या स्त्रीची नितांत श्रध्दा आहे. लोणंद परिसरातही अनेक स्त्रीयांनी लोकगीते जपलेली आहेत. त्यावर त्यांची अपार श्रध्दा व प्रेम आहे. या परिसरात धनगरी स्त्रीगीतांचा भरणा अधिक आढळतो. ही स्त्री जात्यावर, अनेक सणावाराला आपल्या मनातील भाव व्यक्त करते.

विठोबा, बिरोबा, खंडोबा, ज्ञानेश्वर, राम, लक्ष्मण, मारूती तर सीता, सावित्री, द्रौपदी, चांगुणा, सुखंता, तारामती ही तिची श्रध्दास्थाने. यावर ती अपार भक्ती व प्रेम करते. नागपंचमी, संक्रांत, वडसावित्री, दसरा, दिवाळी, या सणाला तर तिच्या आनंदाला पारावर रहात नाही. आपल्या मैत्रिणीसोबत फेरावरची गाणी म्हणणारी स्त्री म्हणजे लोकसाहित्याचा एक दागिनाच आहे.

एकूणच स्त्रीगीतात धनगरी स्त्रीगीतांचा मोठा वाटा आहे. त्यांनी अनेक प्रकारच्या गीतांची जपणूक केलेली आहे. या परिसरातील धनगरी स्त्रीगीतांचे मुख्य चार प्रकार पडतात .

1. जात्यावरच्या ओव्या
2. लग्नविषयक गीते.
3. देवदेवतांची गीते.
4. आणे–उखाणे.

याशिवाय प्रत्येक प्रकाराचे उपप्रकार ही पडतात.

1) जात्यावरच्या ओव्या :-

जात्यावरच्या ओव्यांनी खऱ्या अर्थाने स्त्रीगीतांना समृध्द केले आहे. आजही या जात्यावरच्या ओव्या चालू असताना प्रत्येकाला त्या ऐकावेशा वाटतात. इतक्या त्या भावस्पर्शी असतात. खरी भावनिकता या जात्यावरच्या ओव्यात असते. या ओव्या कधी एकटी स्त्री म्हणते तर कधी दोघी चौघी स्त्रिया म्हणतात. या ओव्यांचे वैशिष्टये म्हणजे त्याला वाद्याची गरज नसते. जात्याचा घरघर आवाज हेच त्याचे वाद्य असते. या परिसरातील कोंडाबाई मल्हारी कोळेकर ही स्त्री आपल्या ओवीत म्हणते –

"उगवला नारायण उगवतानी ऊन पड
आयव नारीच्या शिळया कुंकवाला लाली चढ"

सूर्य उगवल्यानंतर सगळीकडे ऊन पडते आणि त्यामुळे स्त्रीचे सौभाग्य, कुंकू खुलून दिसते. सुर्य किरणांनी तिच्या कपाळीचे कुंकू लालभडक दिसते. तसेच या स्त्रीला सकाळच्या वेळी परमेश्वराला भेटण्याची घाई झालेली असते.

"सकाळच्या पारी जाती रामाला बिगी बिगी
म्होर दत्ताची स्वारी उभी
उगवला नारायण जसा आगीचा भडका
सांगती बाबा तुला चंद्र मातेचा लाडका"

सूर्य उगविल्यानंतर त्याचे रूप कोणत्या प्रकारचे दिसते आणि चंद्र हा आपल्या मातेचा लाडका आहे अशी तिची समजुत अहे. संध्याकाळ जवळ आल्यानंतर तिचे सर्व लक्ष मेंढयाकडे असते. त्यांना ती आपली लक्ष्मी मानते. त्या मेंढयामध्ये आपला बाळ तिला कशाप्रकारे दिसतो याविषयी ती म्हणते –

"दिवस मावळीला आल्या कोकराच्या आया
तान्ह्या त्या माझ्या राघु सोड गोधन बापुराया
मेंढयाच्या आकरी मेंढया बायाच खान
बाळ माझा तात्याबा मधी चालत दिवान
आखरीच्या मेंढया कशा डोंगरी गेल्या नीट
सांगायती बाळ तुला मोड कचेरी सर्ज्या उठ
डोंगरीचा वाघ पंजानी पानी वारी
माझा अंजान मेंढया चारी"

अशाप्रकारे धनगर स्त्री आपल्या मुलासारखे मेंढयावरती जीवापाड प्रेम करते. आपल्या मेंढया चरण्यासाठी सरळ डोंगराकडे जातात तेव्हा ती आपल्या मुलाला म्हणते की तू लवकरात लवकर त्यांच्याबरोबर जा. अशी काळजीही तिला लागलेली आहे.

जात्याला देव मानून घरातील लहानथोर माणसांची ती पूजा करते. सासूरवाशीणीला एक दिवस वर्षासारखा वाटतो. तिला माहेरी जाण्याची सारखी ओढ लागलेली असते. त्यासाठी सण जवळ आला की ती जात्यावर बसून आपल्याला कोणीतरी न्यायला येईल असे म्हणत असते.

"दसऱ्यापासून दिवाळी वीस रोज
वाट पहाते न्त्यि रोज"

दिवाळीचा सण म्हणजे स्त्रियांचा आवडता सण. या सणाला माहेरच्या प्रेमळ वातावरणात रमण्यासाठी तिचे मन आसुसलेले असते.

"दिवाळीची चोळी भाऊबिजेच लुगड
हाक माझा बंधुराया तुझ्याकड
पंचमीचं शिंपण ने रे मला भाऊराया
अवघड आहे सासर पडते मी पाया

आईला सुखी ठेव हेच तुला सांगण

सर्व्या घराची र कर चांगली राखण."

अशा अनेक सणावेळी धनगर स्त्री जात्यावर बसून आपले आई–वडिल, भाऊबहिण, सासूसासरे, पति दीर यांचा स्वभाव, स्वतःची सुखदुःखे ती ओवीतून सांगत असते.

2) <u>लग्नविषयक गीते</u> :–

मानवी जीवनातील एक महत्वाचा व श्रेष्ठ संस्कार म्हणजे लग्न किंवा विवाह होय. विवाहाचा संस्कार चांगल्या रीतीने व्हावा म्हणून बारीकसारीक विधी वा चालीरिती सर्वत्र पाळण्याचा प्रघात आहे. अशावेळी हे नवजीवन नवदांपत्यांना सुखदायी व मंगलदायी व्हावे म्हणून परंपरेने चालत आलेली गाणी धनगर समाजात म्हणण्याची प्रथा आहे. लग्नातील प्रसंगानुसार गाणी म्हटली जातात.

जात्यावरच्या ओव्याप्रमाणे लग्नविषयक गीते उत्साहपूर्वक असतात. लग्नात त्यांना आनंद झालेला असतो. तो उत्साह त्या तोंडाने, नाचून व्यक्त करत असतात. लग्नविषयक गीताचेही अनेक प्रकार पडतात.

1. मेहंदीची गीते
2. हळदीची गीते
3. सव्वासणीची गीते
4. वर्दाव्याची गीते
5. रूखवताची गीते इ.

त्यापैकी रूखवताची गीते हा एक मोठा स्त्रीगीतप्रकार आहे. त्याचा वेगळा विचार करणे आवश्यक आहे. लग्नविषयक गीतातून सासर, माहेर, मुलीचा स्वभाव तिचे आई–वडील अशा सर्वच विषयावर प्रकाश टाकला जातो. गडांगणाच्या वेळी स्त्रीया खालील गाणे म्हणतात.

माझ्या ग मैनाला मागण आल सुखेडाच
मागण आल सुखेडाच घर बाई सावकाराच
गुण बाई मैनाच, लाख लाख मोलाच ।।
गोड पोळया केल्या मी बया
मैनान कशी लावली मया।
मैना ग माझी लई भाग्याची
मालकिन ग होईल चिरेबंदी वाडयाची ।
मैनाला नेसवते चोळी आणि लुगडं
भाग्यवंताशी ग तुझी पडली गाठ
माझ्या ग मैनाला मागण आल सुखेडाच
मागण आल सुखेडाच घर बाई सावकाराचे ।।"

अशा या लग्नविषयक गीतातून नवरा–नवरीचा स्वभाव, त्यांचे बालपण, बालपणातील त्यांच्या खोडया, लग्नानंतर त्यांचा स्वभाव कसा असेल, नवरीला सासू–सासरे कसे भेटतील या सर्वाचे व्यक्तिचित्र ती उभे करते. त्यात एक वेगळाच भाव व लय असतो. ही गाणी सर्वजण अगदी आवडीने पहात असतात.

शुभ कार्यासाठी प्रथम रात्री मेहंदी लावण्याचा प्रघात पूर्ण देशभर आढळतो. धनगर समाजातही स्त्रीया शुभकार्याप्रसंगी आपले हात लाल करून सौंदर्य वाढवितात. अशी मेहंदी लावीत असताना त्यांचे तोंड बंद नसते.

"मेहंदीच्या हातात
जोडव्याच्या पायात
हात झाला लालीलाल
सुंदर ग बाई फुल

आम्ही गरीबाच मुल

मेहंदी काठा लवकर

नका रंगवू परकर

मेहंदीत घाला कात

नका पाहू जात पात

माझी मेहंदी रंगली

मैना माझी चांगली

हात बाई हसला

नवरा मुलगा फसला."

तर नवरा नवरीला हळद लावताना –

"माझी मैना बसली चौरंगावरी

लुगडयांची निरी पेलविना पोरी

मैना झाली नवरी ।

मैनाच अंग जस केवडयाच सूप

माझ्या ग मैनाच देखण रूप

माझ्या ग मैनाच हळदीच अंग

माझी मैना जाईल नवऱ्यासंग

माझी मैना जसी रामाची सिता

पुढं होईल सती सावित्री सारखी माता"

असे गाणे सुरू होते. या गीतातून मैनाच वय लहान असल्यामुळे तिला चौरंगावर बसल्यानंतर व्यवस्थित साडी धरता येत नाही. माझी मैना जणू काही रामाची सीता आहे. म्हणून पुढ ती निर्मळ अशा सावित्रीसारखी होईल अशी कबुली ती देते.

लग्नामध्ये हळदीच्या गीतात व देवकाच्या वेळी सव्वासणी गाणी म्हणतात.

"दाजीबा नीट बसा चौरंगावरी
म्हणून तर मैनाला दिलीय खरी
आमची मैना ह्राय देखणी नवरी
नका करू तुनची नजर कावरी बावरी
लांबूण आलो आम्ही सर्व्या सव्वाष्णी
मैनाच वाईट करू नका मनमानी
आम्ही सांगतो तुमच्या कानी
मैना आहे आमची देखणी
देवाच नाव आमच्या सदा मुखी
मैनाला आमच्या ठेवा सुखी."

लग्न लावण्यापूर्वी घोडयावर बसून नवरदेवाची वरात काढली जाते. तेव्हा वरातीमागे करवल्या जी गाणी म्हणतात त्यांना वर्दाव्याची गाणी म्हणतात. त्यात नवरदेवाचा स्वभाव, त्याचा पराक्रम, धाडस सांगून त्याचे गुणगान गायले जाते.

"भाऊ माझा ग तालेवार
दिसतोय जसा शिलेदार
टापा टाकीत याचा घोडा
सगळी रस्ता सोडा
मंडवळया याच्या डोक्याला
उपरण यांच्या खांद्याला
ह्याच्या पायात सूटबूट
ह्यान नाही केली लयलूट

वाजंत्री वाजतोय घोडा नाचतोय
खुशाल फिरतोय हिकड तिकड
वाट बघतय वऱ्हाड तिकड
माझा भावाचं किती गुण गाउ
डोळ भरून त्याचा रूबाब पाहू."

लग्न झाल्यानंतर होणरा कार्यक्रम म्हणजे रूखवताचा होय. दोन्हीकडच्या स्त्रीया एकमेकींची थट्टा–मस्करी आपल्या गीतातून करतात. या गीतातील विनोद हसतखेळत असतो. रूखवताच्या गाण्याला "उखाणे" ही म्हणतात. एकमेकांना नावे ठेवणे हा या गीतांचा विशेष असतो. रूसवा–फुगवा राग असला तरी तो हसतखेळत असतो. उदा.

"आला आला रूखवत रूखवतात पार
नवरीची कुरवलो दिसतीय हिरवीगार
लुगड धुतल्याल झाल तिनवार."

"आला आला रूखवत रूखवतात काकान
नवरीची कुरवली हिरीच झाकान."

"आला आला रूखवत रूखवतात काटयाची फांजर
नवरीची कुरवली दुधावरली मांजर."

"आला आला रूखवत रूखवतात पेंढी
नवरीची कुरवली म्होरपची मेंढी."

"आला आला रूखवत रूखवतात होती दिवळी
ईनबाई झाली प्विळी पण दिसतीय काळीसावळी."

"आला आला रूखवत रूखवतात आटार–बटार
आमचा नवरदेव मागतूय लाखाची मोटार."

अशाप्रकारे रूखवतात नवरा-नवरीच्या मित्रमैत्रिणींचा स्वभाव, त्यांचे वागणे अशा अनेक गुणांचा उल्लेख केला जातो. लग्न लागल्यानंतर खालील गीताने आपण मंडपात आहोत असा भास होतो व लग्नाचा शेवट होवून मंडपातील माणसं आपआपल्या घरी जातात.

तिळ तांदळी भरल ताट
तिळ तांदळी भरल ताट
वर ठेविली पाच आवळ
काग रडत वेड मावळ
आसू ज्याची व्हती त्यानी नेली ।।1।।
तिळ तांदळी भरल ताट
वर ठेविल पाची गडू
गणागोताला येत रडू
आसू ज्याची व्हती त्यांनी नेली
वेडी मायाच वाया गेली ।।2।।
तिळ तांदळी भरल ताट
वर ठेविल पाची गव्हू
काग रडत वेड भाऊ
आसू ज्याची व्हती त्यानी नेली
वेडी मायाच वाया गेली ।।3।।
तिळ तांदळी भरल ताट
वर ठेविलया पाची फणी
का ग रडत वेडया भणी
आसू ज्याची व्हती त्यानी नेली
वेडी मायाच वाया गेली ।।4।।

तिळ तांदळ भरल ताट
वर ठेविली एक भाजी
का ग रडती वेडया आजी
आसू ज्याची व्हती त्यानी नेली
वेडी मायाच वाया गेली ।।5।।
तिळ तांदळी भरल ताट
वर ठेविला एक चापा
नकू रडूस वेडया बापा
दारी व्हती बोरी बाग
त्याच्याव बसला जावाय चोर
स्मिता गेलीय त्याज्या बर"।।6।।

मुलगी सासरी गेल्यानंतर तिच्या घरच्यांना फार दु:ख होते. वाईट वाटते. परंतु आधुनिक काळात आपल्या घरच्यांना रडू नका असा संदेश देणारी, स्त्री, मुलगी या परिसरात आहे म्हणून या स्त्री गीतांची जपणूक परंपरेने चालत आलेली आहे.

3) <u>देवदेवतांची गीते</u> :–

भारतीय स्त्रीच्या जीवनत देवदेवता यांना श्रध्देचे स्थान आहे. धनगर स्त्री याला अपवाद नाही. परमेश्वरावर तिची अपार श्रध्दा आहे. या तिच्या श्रध्दा, विधी, सण, उत्सव, प्रसंगी व्यक्त झाल्या. परमेश्वराची ही गीते अंतरीक भावनिक जिव्हाळयाने भरलेली आहेत तिच्या या गीतात निरनिराळया देवदेवतांची वर्णने, जीवनातील घटना प्रसंग, त्यांचे भक्ताशी असलेले नाते दिसून येते.

मराठी स्त्री सारखी धनगर स्त्री ही परंपराप्रिय असून देवतांविषयी तिच्या मनात आत्यंतिक स्वरूपाचा श्रध्दाभाव आहे. तिने आपल्या हृदयात शंकर–पार्वती, विष्णु–लक्ष्मी, राम–सीता, श्रीकृष्ण–राधा, विठ्ठल–रूक्मिणी , या देवतांबरोबर खंडोबा–बानू, धुळोबा–भिवाई,

वाग्देव, बिरोबा, कडजाई, वडजाई, मरीआई, लक्ष्मीआई अशा देवतांना स्थान दिले आहे. तिने आपल्या गीतातून या देवतांची आळवणी केली आहे.

देवदेवतांची भक्ती केल्याने आपले जीवन सुखी बनते. आपणाला पुण्य लाभते. जीवनातील संकटे, दु:खे दूर होतात. स्त्रीजीवन म्हणजे अपमान, कुचंबणा आणि काबाडकष्ट तिच्या पाचवीला पुजलेला. यातून सुटका करण्यासाठी तिला देवदेवता म्हणजे विसाव्याच ठिकाण वाटते. थोडा विसावा मिळाला की ती आपल्या मनातील भाव गीतातून व्यक्त करते व तिला जीवन जगण्याचा मार्ग सापडतो. स्त्रीयांच्या गीतात पंढरीच्या पांडुरंगाची गीते अधिक आढळतात. कारण मराठी संताचे दैवत म्हणते विठोबा म्हणून मराठी स्त्रीने या दैवताचा मोठया श्रध्देने स्विकार केला आहे. धनगर स्त्रीने विठ्ठलाला आपल्यापैकीच एक मानले आहे. तिने विठ्ठलाला आपली आई मानले. अशा या विठ्ठलाला भेटण्यासाठी ती सदैव आतुर झालेली असते.

"पंढरीला जाते गरूडखांबाला देते धक्का
कधी भेटेल मला विठु सखा."

पंढरीला जाताना आडवी कोणकोणती गावे लागतात, ती गावे कोणत्या बाबतीत प्रसिध्द आहेत, पंढरीला जाण्यासाठी आपण बरोबर कोणकोणला न्यायचे, तिथ गेल्यावर काय काय पहायाचे याची उत्सुकता स्त्री मनाला लागून राहिलेली असते.

"पंढरीला जाया आडव लागल लोणंद
संग माझ्या राघू-मैना जिवा माझ्याला आनंद
पंढरीला जाया आडव लागल कापडगाव
हिरव्या चोळीवरी देवा विठ्ठला तुझ नाव
पंढरीला जाया आडव लागल तरडगाव
देवा त्या विठ्ठलाची हवा रिंगणी पाहव
पंढरीला जाया आडव लागल फलटण
विठ्ठलाच्या आधी घ्याव रामाच दर्शन

पंढरीला जाया आडव लागल बराड

देवा त्या विठ्ठलासंग साधू याच वऱ्हाड

पंढरीला जाया आडवी लागली टाकळी

देवा त्या विठ्ठलाची गोड विण्याला साखळी

त्या विठवर नामदेव धक्याला

व्हती गर्दी देव कुंडलिक सख्याला

पंढरीला जाया संग नेती मी भावाला

सोन्याच्या कळशीनं पाणी सर्व्या देवाला

पंढरीला जाया संग नेहती मी आईला

चंद्रभागेच्या काठी पेंढी सोडती गाईला

पंढरीला जाया संग नेहती मी बापाला

सोन्याच्या कळशीनं पाणी घालती मी चाफ्याला

विठ्ठल बोले जनी माझी गुरूबहिण

रूक्मिण बोले पुरे तुमचे साधुपण

पंढरपुरामधी जनाबाईचा गेला तवा

दवंडी पिटावी नामदेवा."

सर्व देवदेवतामध्ये शंकर पारबत्ती थोर असल्याने त्यांनी सर्व सृष्टीची, पृथ्वीची निर्मिती केली आहे. अशी या स्त्रीमनाची धारणा आहे.

"शंकरापरास पारबत्ती किती शहाणी

समद्या पृथ्वीचा पाया रचिला दोघायानी"

मल्हारी – खंडोबाच्या दोन बायका कशा होत्या याची माहिती धनगर स्त्रीला आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

"सकाळी उठुनि बानु टाकती भाकरी

देव मल्हारी चाकरी

सकाळी उठुनी बानु लोटती मेंढवाडा

देव मल्हारी झाला वेडा

वाण्याची म्हाळसा धनगराची बानुबाई

दोघीयाच्या दोन जाती कशा जेवल्या एका ताटी

देव मल्हारी तुझ्यासाठी."

अशा अनेक देवांना स्त्रीहृदयात म्हत्व आहे. सर्व देवांना भेटल्यानंतर काशीला जाण्याची तिची मनोमन इच्छा असते. पण काशीतिर्थ होत नाही याच दु:ख ही तिला आहे.

"रामलक्ष्मणाची कथा ऐकत व्हती मजान

जेजूरीचा खंडेराया गडावरती उभा

सोडी बनाकीचा सोगा

जेजुरीच्या खंडेरायाच पाहत व्हती मुख

चिंचवडचा गणपती हापहुप

चिंचवडचा गणपती पाहून घेती पैशाच्या लाह्या

जाती मुंबईचा राणीबाग पाह्या

मुंबईच्या राणीबागत तऱ्हतऱ्हची चित्र

आली सासवडच्या सोपानकाकाची पत्र

तुकाराम महाराजांच्या खांद्यावर बुक्क्याची पावल

ईनबाय सर्व देव पाहिल

पण काशी तिर्थ राहील."

अशी या स्त्रीची अवस्था होते. आपल्या गीतात ती सर्व देवांना घेऊन त्यांना ऱ्हदयात स्थान देते.

4) **आणे–उखाणे** :–

लग्न समारंभात विवाह संपल्यानंतर वधू–वराच्या बाबतीत एक मोठा गंमतीचा व इतरांच्या दृष्टीने आवश्यक आणि आवडीचा असा एक गोड कार्यक्रम असतो. तो म्हणजे वधूवरांनी एकमेकांचे नाव घेणे किंवा सांगणे. याच पध्दतीला आणे–उखाणे म्हणतात.

वधूने पतीचे किंवा वराने पत्नीचे नुसते नाव न सांगता अलंकारीक किंवा काव्यात्मक भाषेत सांगावे असे इतर लोकांना वाटत असते. वधूवरांच्या भोवती समवयस्क लोक जमून त्यांन नाव घेण्यासाठी चिडवून चिडवून बेजार करतात आणि मग ती नाव घेण्यास सरसावते.

इंग्रजीत आईला म्हणतात मदर
xxxxx राव सोडाना माझा पदर

अशी आजच्या काळातील मुलगी इंग्रजी, हिंदी भाषेत नाव घेताना दिसते.

"वन बाटली टू ग्लास
xxxxx माझे फसक्लास."

अशा अनेक उखाण्यांनी स्त्रीमन भरलेले आहे. या उखाण्यात "रूखवताचा" एक वेगळाच वैशिष्ट्यपूर्ण प्रकार आहे. लग्नात वर–वधूकडील स्त्रीया एकमेकींना रूखवत घालतात आणि तो सोडवायला सांगतात.

"आला आला रूखवत रूखवतात होता जवास
हीच नवरी मिळाली म्हणून सासऱ्याने केला नवास."
"आला आला रूखवत त्यात होता तवा
विहिणीन लुगड धुतलय पानीपतची लढाई झाली तवा."
"आला आला रूखवत त्यावर टाकल बुंदीच गोळ
पाटलाच वराड उकीरडयावर लोळ."

खेडयातील स्त्रियांचा उखाणा हा लांबलचक, भला मोठा असतो. सांसारिक जीवनातील सर्व प्रकारचे भाव त्यात आढळतात. ईनीला घातलेला आणा फारच रूचकर वाटतो.

"आला आला रूखवत जाणवस दारी
गाडया गेल्या बारामती माफ केल सोलापुरी
दळाय टाकल इंदापुरी बाजार केला माठामधी
उभी राहती भोरामधी
रत्नागिरीत पाव ढोल ढोल पाव पुण्याचे
शिमग गाव बडोद्याच
चांदगांव नांदगाव पाण्यातल खामगाव
भैरून गुतगाव, गावाच नाव जांभळी
उशाला पान संबळी
कऱ्हाड कानावला वैराग दानवला
कातचा कातबोल त्याच्या शिवली न्हाती
हितली सुगरणशाही कुठ गेली
तिची खिर उतू गेली
सुन म्हणती सासूला आमच काय
धरा बामणाच पाय
बामण म्हणतू आमचा मेळा
धरा वाजंत्र्याचा गळा
वाजंत्री म्हणती आम्ही काय केल
आमच्या बुदली भोवती आल
ईन रूसली
जाणवस घरी जाऊन बसली
बसाय टाकला उंच पाट

चोळी शिवली जरी काट

जरी काट मागचा, हाती चुडा भिंगाचा

ईन फुन फुन रड

ईवायान घेतली कड

नेली अत्तराच्या पेड

बांधल जिलीबीच वेड

ईन फुन फुन रड

ईवायान घेतली कड

नेली सोनाराच्या पेड

तिनशेची घेतली ठुसी

ईनबाईच्या मनाची झाली खुशी

हळदीच्या चिठ्ठया कुकाच्या चिठ्ठया

पानाच्या पानपट्टया

आला आला रूखवत रूखवतात गरा

ईनबाई ह्याच आन्याच उत्तर करा

तरच विचार बरा."

अशाप्रकारे पतीपत्नीचे, ईनबाईचे उखाणे ऐकून जमलेली मंडळी खूष होते. नंतर तरूणापासून ते वृध्दापर्यंत सर्वांची पाळी येते. मग रंग चढतो. यात दोन चार तास कसा वेळ जातो हे देखील कळत नाही. आधुनिक काळात शहरात किंवा खेडयात जरी डोकावले तरी नाव घेताना नववधूंचा पवित्रा आढळतो. लग्न ठरल्याबरोबर बऱ्याच मुली निरनिराळया प्रकारचे बरेचसे उखाणे गोळा करतात.

उखाणा म्हणजे विवाहित स्त्रीच्या जीवनातला एक मोठा गंमतीचा आणि करमणुकीचा विषय असतो. अशा या उखाण्यातून अंतरीची ओढ दिसते. यातून संसाराचे, संसारसुखाचे,

जिवाभावाच्या माणसांचे शब्दचित्र आढळते. अशाप्रकारे परिसरातील स्त्रियांची गीते मनोवेधक, हृदयाला भिडणारी आहेत.

3) **बालगीते** :–

विशाल जगाच्या कुशीत लहान मुलांच एक वेगळच रम्य व उदात्त विश्व असते. निवडक शब्द घेऊन त्यांना ठेका देत स्वराशी नाते जुळवित राहणे हा बालगीताचा विशेष होय. या गीतांना नेमका अर्थ असतो असे नाही पण त्यात प्रेम व जिव्हाळा असतो. उदा.

"चांदोमामा चांदोमामा भागलास का
निंबोणीच्या झाडाखाली लपलास का ?
निर्बोणीच झाड करवंदी
मामाचा वाडा चिरेबंदी
मामा मामी येवून जा
तूपरोटी खाऊन जा
तूपात पडली माशी
ती झाली काशी
कासे कासे दिवा लाव
दिवा गेला वाऱ्यात
कासीला नेली चोरान
चोराच्या हातातन सुटली
बागखाली गुतली
बाग बाग कात ग
तुझी पिल्ल सात ग
एक पिल्लू मेल
गाडीत घालून नेल

गाडी गेली नगरी
नगरीच्या बायांनो
पाणी नका ढवळू."

"बाळ गेला बोराला
हाका मारी पोराला
दिसतय बाळ घरकुल
बाळाच्या हाती कुरकुल
बाळाची बोर सांडली
चहुकडं मांडली
पोर लागली येचायला
बाळ लागल नाचायला."

चिमणे चिमणे काय ग
तुझी पिल्ल पाच ग
एक पिल्लू मेल
गाडीत घालून नेल
गाडी गेली डोंगराला
शिंग लागली नरडीला ।।1।।
ओढयाला आला लोंढा
भिजला माझा गोंडा
गोंडयाच्या हाती रूपाया
भाऊ माझा शिपाया ।।2।।

जेजुरीचा खंडोबा

नाव ठेवा लांडोबा

लांडोबा गेला ताकाला

माशी चावली नाकाला ।।3।।

तेलीन गेली तेलाला

विंचू चावला गालाला

बामन गेला पेंढीला

साप चावला शेंडीला ।।4।।

आपल लग्न नक्की कोणाबरोबर करावे असा प्रश्न लहानग्या चिमुरडीला पडतो. म्हणून ती आपल्या आजोबाला विनंती करते की जो मला चांगले सांभाळील त्याच्याशी माझे लग्न करा.

"ईडले लिंबू झेलू चला बाई झेलू चला

आजोबा आमचे लगीन करा बाई लगीन करा ।।

डॉक्टर नवरा नको मला बाई नको मला

रोज रोज सुया देईल मला बाई देईल मला

ईडले लिंबू झेलू चला बाई झेलू चला

आजोबा आमचे लगीन करा बाई लगीन करा ।।1।।

मास्तर नवरा नको मला बाई नको मला

रोज रोज झेडया देईल मला बाई देईल मला

ईडले लिंबू झेलू चला बाई झेलू चला

आजोबा आमचे लगीन करा बाई लगीन करा ।।2।।

शेतकरी नवरा नको मला बाई नको मला

रोज रोज शेतात नेईल मला बाई नेईल मला

ईडले लिंबू झेलू चला बाई झेलू चला

आजोबा आमचे लगीन करा बाई लगीन करा ।।4।।

धनगर नवरा हवे मला बाई हवे मला
रोज रोज दूध पाजील मला बाई पाजील मला
ईडले लिंबू झेलू चला बाई झेलू चला
आजोबा आमचे लगीन करा बाई लगीन करा ।।4।।

अशा अनेक बालगीतांनी हा परिसर फुललेला आहे. ही गीते मुले पालाव, रानात, मेंढयाबरोबर, शाळेत म्हणत असतात. धनगराच्या लहान मुलीला दु:ख वाटते ते म्हणजे लवकर लग्न झाल्याचे. त्यामुळे तिच्या मनात निराशा, उदासीनता आलेली आहे. ती म्हणते की –

"माझे माहेर निंबोडीत
दिली मला कोकणात
नारळाचे नारळ मला तोडता येईना
पडले मी पाण्यात बाई मी पडले मी पाण्यात ।।1।।
भाताचे रोप मला लावता येईना
पडले मी चिखलात बाई पडले मी चिखलात
गाईची धार मला काढता येईना
पडले मी शेतात बाई पडले मी शेतात ।।2।।
घरचे सारे गेले बाजाराला
मलाच ठेवले बकरी राखायला
अडकले मी रानात
बाई अडकले मी रानात ।।3।।

अशी खंत ती व्यक्त करते. तर नविन शाळेत जाणाऱ्या मुली गुरूजींना उताऱ्याचा त्रास होतो म्हणून विनवतात आणि शाळेला जाण्यास नकार देतात.

"नेहमीच गुरुजी, तुमची घाई
नका लावू उतारा आणायला
जावू कशी कशी मी शाळेला

काही मुली नाव, उखाणा घेतानाही दिसतात.

"अलीकड डोंगर, पलीकड डोंगर
मध्येच माझे घर
घरात खाट
खाटेवर गादी
गादीव उशी
उशीवर ग्लास
गलासात घडयाळ
घडयाळात वाजली एक
मी विठ्ठल पाटलाची लेक."

तर एवढया लहान वयात मी नाव कसे घेऊ असे ती सांगते.

"केळीच्या पानावर पाय कसा ठेवू
लग्नाच्या अगोदर नाव कस घेवू."

आजच्या काळात आई वडीलांचे भांडण झाल्यास त्यात मध्यस्ती केली तर काय होते. हे सांगायला ही ती घाबरत नाही.

"आभाळातून पडले गुलाबाचे फूल
पप्पा–मम्मीचे झाले भांडण
मीच गेले सोडवायला
मलाच काढले बडवायला."

अशा अनेक गीतांचा संच म्हणजे बालगीत होय. आनंद, करमणूक म्हणून ही गीते मुल–मुली म्हणत असतात.

अशा या धनगरी गीतांनी लोणंदचा परिसर व्यापलेला आहे. अशिक्षित, अडाणी लोकांची ही गीते आहेत. त्याला अलंकारिक भाषा नसली तरी ठेका, ताल, लय आहे. त्यामुळे ही गीते मनाला भुरळ पाडतात. अशीही स्त्री पुरूषांनी जपलेली, वैचित्र्याने नटलेली या परिसरातील लोकगीते आहेत.

क) <u>खंडाळा तालुक्यातील लोणंद परिसरातील धार्मिक कुलाचार</u> :– (देवदेवता, सण, वृत्ते इ.)

महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात धनगर समाजाचे प्रमाण अधिक आहे. त्यांची संस्कृती आगळी वेगळी असून या संस्कृतीचे विशेष हिंदू संस्कृती सारखेच असले तरी त्यात आगळे वेगळे सौंदर्य असल्याचे आढळून येते. या समाजाची भ्रमणगाथा उल्लेखनीय आहे. त्यांच्या अवस्था, त्यांचे भटक जीवन, त्यांच्या चालीरीती, रितीरिवाज, कलागुण, खेळ, नृत्य इ. च्या वेगळेपणात संस्कृतीचे सौंदर्य भरलेले आहे. यामध्ये त्याच्या देवदेवता, त्यांचे सण याविषयी असणारी त्याची श्रध्दा, भक्ती याला त्याच्या जीवनामध्ये महत्वाचे स्थान आहे.

दक्षिणेच्या धार्मिक, सामाजिक इतिहासात धनगराच्या देवाचे, त्यांच्या धर्मश्रध्दांचे, त्यांनी निर्माण केलेल्या कथागाथांची आणि त्यांच्या विक्रमी कर्तृत्वाचा मोठा अभिमान आहे. ही श्रध्दास्थाने ते जीवापाड जपतात. या श्रध्दा–भावनाचा ठेवा या पिढीपासून ते त्या पिढीपर्यंत त्यांनी पोचविलेला आहे. त्यामुळे त्याच्या जीवनाचा पूर्वीपासूनचा ओघ आजतागायत प्रवाहीत आहे. तो कोठेही खंडीत झाला नाही हे धनगर समाजाचे महत्वाचे वैशिष्टय समजावे लागेल. त्याच्या जीवनाच्या भ्रमंतीत आचारविचार विधीचे अखंडत्व कधीच खंडीत झाले नाही. ही गोष्ट येथे आवर्जुन नमूद करावीशी वाटते.

महाराष्ट्राच्या धार्मिक, सामाजिक इतिहासाचा अभ्यास करीत असताना जर धनगरांच्या देवांचा अभ्यास केला नाही तर आपल्या परंपरेतील अनेक महत्वपूर्ण अंगाचे खरे रहस्य आपणाला कळणार नाही. जीवनामध्ये मनुष्य अनेक संकटांना तोंड देताना अपुरा पडतो. त्याच्या सर्व शक्ती अपुऱ्या पडतात. तेव्हा तो परमेश्वराचा धावा करतो. आधार घेतो. त्याची पूजा भक्ती करतो. आणि परमेश्वराला विनंती करतो की, "हे देवा मला या संकटातून वाचव, मुक्त कर मी तुझी मनापासून भक्ती करेन." तशाचप्रकारे धनगर समाज ही अनेक देवदेवतांची पूजा करतो. उदा. बिरोबा, खंडोबा, वाग्देव, मस्कोबा, धुळोबा, विठोबा, कडजाई, वडजाई, मरीआई, लक्ष्मीआई, भिवाई इ. यापैकी खंडोबा आणि बिरोबा यांना धनगर समाजात अतिशय महत्त्व असते. या देवांना त्यांनी आपल्या हृदयात कायम जपलेले आहे. दक्षिण भारतातील धनगर लोक बिरोबाला अतिशय मानतात. या संदर्भात रा.चिं.ढेरे[11] यांनी संशोधन करून स्पष्ट केले आहे. बिरोबाला लोक वेगवेगळया भागात प्रेमाने बिरूबा, बिरोबा, बिराप्पा, बिरूपा, बिरण्णा[12] असे म्हणतात. बिरोबा हा महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र या भागात प्रामुख्याने आढळणारा देव, सर्वांचे परमप्रिय दैवत. बिरोबालाच काहीजण विठ्ठल म्हणतात. तर विठ्ठलाला बिरोबा म्हणतात इतके दोघांचे संबंध एकनिष्ठ व एकरूप आहेत. यावरून परमेश्वर हा सर्व ठिकाणी सारखाच असून तो शक्तीमान आहे. फक्त त्यांची नावे प्रांतपरत्वे वेगळी आहेत.

समर्थ रामदास पंढरपूरला गेले असताना विठ्ठलाची मूर्ती पाहून "येथे उभा का श्रीरामा" असा अभंग म्हणतात. विठ्ठलाच्या ठिकाणी त्यांना प्रभु रामचंद्राचे दर्शन होते. "अंतरात्मा हाच परमेश्वर" ही भक्तीभावना सर्व जाती धर्माच्या, लोकांच्या मनामध्ये अग्रस्थान घेऊन बसली आहे. वारकरी संप्रदाय, समर्थ संप्रदाय, दत्त संप्रदाय, नाथ संप्रदाय हे सारे भक्ती संप्रदाय "अंतरात्मा हाच परमेश्वर" मानत आलेले आहेत. उदा. "दासबोधाच्या[13] आठराव्या दशकाच्या पहिल्या समासात रामदासांनी ही कल्पना मांडली आहे.

"धन्य धन्य तू गा खंडेराया । भंडारे होय पिवळी काया ।
कांदे भरीत रोडगे खाया । सिध्द होती ।।11।।

धन्य तुळजाभवानी । भक्ता प्रसन्न होते जनी ।
गुणवैभवास गणी । ऐसा कैसा ।।12।।
धन्य धन्य पांडुरंगा । अखंड कथेचा होतो धिंगा ।
तानमान रागरंगा । नाना प्रकारी ।।13।।
धन्य तू गा क्षेत्रपाळा । उदंड जना लाविला चाळा
भावे भक्ती करीता फळा । वेळ नाही ।।14।।
रामकृष्णादी अवतार । त्यांचा महिमा अपार ।
उपासनेस बहुत नर । तत्पर झाले ।।15।।
सकळ देवांचे मूळ । तो हा अंतरात्मचि केवळ ।
भू मंडळी भोग सकळ । त्यासीच घडे ।।16।।
नाना देव होऊन बैसला । नाना शक्तीरूपे झाला ।
भक्ता सकळा वैभवाला । तोची एक ।।17।।

लोणंद परिसरात सालपे गावी बिरदेवाचे प्रमुख ठाणे आहे. लोणंद–सातारा रस्त्यावर सालपे हे गाव डोंगरकपारीत वसलेले आहे. जवळच सालपे घाट आहे. या बिरदेवाची यात्रा दसरी पोर्णिमेला भरते. यात्रेला हजारो लोक जमतात आणि यात्रेत उत्साहाने भाग घेतात. ही यात्रा दोन दिवस असते. पहिल्या दिवशी देवाला आंघोळ घालून नवीन कपडयाचा पोशाख केला जातो. पोळयाचा नैवेद्य देवाला दाखविला जातो. संध्याकाळी धनगरी ओव्यांचा कार्यक्रम होतो. दुसऱ्या दिवशी सकाळी असंख्य बकऱ्यांचा बळी दिला जातो. दिवसभर भंडारा उधळून गजनृत्याचा जोरात कार्यक्रम होतो. यावेळी गजनृत्याच्या स्पर्धा लावल्या जातात. यात गावोगावची गजनृत्याची मंडळे सहभागी होतात. ही गजनृत्य पहात असताना पाहणाराही नृत्य करावयास सुरूवात करतो. इतके प्रेरणा देण्याचे सामर्थ्य गजनृत्यात आहे. संध्याकाळी पाच वाजता अनेक नामांकित पैलवानांच्या कुस्त्या होतात आणि यात्रा संपल्याची घोषणा गावकरी करतात अन् पाहुणे मंडळी आपआपल्या गावी निघून जातात.

या यात्रेचे वैशिष्टय असे की या यात्रेत घोडयांचा आणि घोंगडयांचा मोठया प्रमाणत बाजार भरतो. धनगर समाजाला इतरत्र भटकताना ज्या आवश्यक गोष्टी आहेत त्यातील घोडा आणि घोंगडी या दोन महत्वाच्या व उपयुक्त वस्तू आहेत. घोडयांचा उपयोग ओझे वाहण्यासाठी तर घोंगडीचा उपयोग ऊन, वारा, पाऊस या पासून संरक्षण मिळण्यासाठी करतात. या दृष्टीने या यात्रेला विशेष महत्व आहे. बिरोबा हा खंडोबाचा अवतार, खंडोबा शंकराचा अवतार समजला जातो. धनगरी समाजात मुख्य देव म्हणून शंकराला मानतात. ते सतत शंकराची आराधना करतात. देवाला ते कधी नमस्कार करीत नाहीत. शंकराच्या नावानं, बिरोबाच्या नावानं चांगभलं म्हणतात. चांगभल म्हणजे चांगले, भले. आम्ही तुझे जसे चांगले केले आहे तसे आमचे व आमच्या मुलाबाळाचे चांगले, भले कर. अशी ते आपल्या देवाला सतत विनंती करतात.

बिरोबा इतकीच महत्वाची या परिसरातील जेजूरीच्या खंडोबाची यात्रा समजली जाते. खंडोबाला मल्हारी, मैलार, मलहारी, म्हाळसाकांत, मार्तंडभैरव, खंडोबा अशी नावे आहेत. खंडोबाला खंडोबा हे नाव कसे मिळाले तर स्कंद पर्वतावरील श्री शिव आपल्या खड्गासह मल्ला सुराचा वध करण्यासाठी आला. त्यावेळी त्याचे खड्गाला खंडा नाव पडले. हा श्री शंकराचा स्कंदावतार खंडामंडीत झाला म्हणून त्यास "खंडोबा"[14] असे म्हणतात.

खंडोबाच्या व विठ्ठलाच्या मूर्तीत साम्य आढळते. पांढरे शुभ्र धोतर, डोक्यास रुमाल, अंगरखा, उपरणे, असा पोशाख असतो. त्यास बेलभंडार वाहिला जातो. येळकोट येळकोट जयमल्हार या नावाने गर्जना करतात. खंडोबाच्या हातात त्रिशूल, डमरू, पानपत्र, खड्ग असून त्याच्याजवळ नंदी, घोडा आणि कुत्रा यांना मान आहे. महाराष्ट्रात जी खंडोबाची अकरा देवस्थाने आहेत त्यामध्ये जेजुरी एक महत्वाचे ठिकाण मानले जाते. जेजुरी हे गाव पुणे-पंढरपूर रस्त्यावर उंच डोंगरावर आहे. माघ महिन्यात खंडोबाची मोठी यात्रा भरते. सहा दिवस देवाजवळ नंदादीप तेवत ठेवला जातो. दररोज पूजा व आरती चालू असते. सणाच्या दिवशी देवाला पुरणपोळीचा नैवेद्य केला जातो. याशिवाय सोमवतीला व प्रत्येक रविवारी असंख्य भक्तगण जेजूरीला जातात.

धनगर समाजात नवस बोलणे हा एक महत्वपूर्ण प्रकार आढळतो. खंडोबा तर नवसाला पावणारे कामीक दैवत मानले जाते. नवस हे वेगवेगळया प्रकारचे असतात. काही नवस साधे तर काही अघोरी स्वरूपाचे असतात. यात पहिला मुलगा–मुलगी झाल्यास देवास वाहतात सोडतात. त्यास वाघ्या–मुरळी म्हणतात. देवास कावडी घालणे, जागरण करणे म्हणजे वाघ्या मुरूळीकडून देवाची गाणी म्हणवून घेणे. तळी भरणे – उचलणे, देवास भरीत रोडगा वाहणे, दहिभाताची पूजा बांधणे, पुरणपोळी करणे, मांसाचा नैवेद्य दाखविणे, बगाड लावणे, लंगर तोडणे, वारी मागणे, विस्तवावरून चालणे इ. नवसाचे प्रकार या समाजात असलेले दिसून येतात. अंधश्रध्दा निर्मुलनाच्या मोहीमा सर्वत्र चालू असल्यामुळे काही अनिष्ठ प्रथा या समाजातील आपोआपच बदं झालेल्या आहेत. उदा.मूल वाहणे, अग्नीवरून चालणे इ.

या परिसरातील सर्व देवंना पुरणपोळीचाच नैवेद्य अधिक दाखवितात. याशिवाय रोडगा, भरीताचा नैवेद्य चालतो. तसाच मांसाचा नैवेद्य देवाला दाखवितात. पण तो देवस्थानाच्या बाहेरून दाखवितात. असे हे पुरणपोळी, रोडगा भरीत व मांस या तीन प्रकारचा नैवेद्य जास्त प्रमाणात देवांना दाखविला जातो.

खंडोबाची पूजा करताना भंडाऱ्याला खूप महत्व असते. खंडोबाची तांदळा, शिवलींग व चतुर्भुज मूर्ती या तीन ही रूपकाची पूजा होते. त्याच्याबरोबर कुत्रा व घोडे हे प्राणी असतात. सर्व थरात याची उपासना लोक करतात. खंडोबा हे दैवत मूळ क्षत्रियांचे असले तरी प्रामुख्याने ते धनगर समाजाचे आराध्यदैवत मानले जाते. ब्राम्हणापासून ते तहहयात सर्व समाजात खंडोबाची लोक भक्ती करतात. त्यामुळे समाजाच्या सर्व थरात खंडोबा एक लोकप्रिय देव समजला जातो.

देवाचे पुजारी दरवर्षी सौम्य व घोर सवरूपाचे विधी करतात. घोर विधी करणारे लोक आपल्या अंगावर मोठी जखम करून घेतात. या परिसरातील दावजी पाटील अंगात येणारे पुजारी सुईने आपल्या जिभेचे रक्त काढतात. सर्व शरीर ते रक्ताने भरवितात. तर कडजाई अंगात येणाऱ्या स्त्रियांना कोळशाच्या ज्वलंत निखाऱ्यावर नाचावे लागते. तर काही ठिकाणी देवाची व्यवस्थित पूजा केली नाही तर तो रडतो, अंगावर चाबुक, काठयाचे जोरात प्रहार करतो. हे सर्व

विधी करीत असताना नृत्य चालू असते. तसेच वाद्य चालू असते. आजही या परिसरात विधीचे स्वरूप पहिल्यासारखेच पहावयास मिळते. शरीरावर जर अशी मोठी जखम झाली तर ती भंडाऱ्याने बरी होती अशी समजूत आहे. पण या समजुतीला वैद्यकीय पार्श्वभूमी आहे हे सिध्द होते. लोकाचार व लोकव्यवहाराच्या माध्यमातून प्रचलीत लोक समजुतींना वास्तवाचे कसे अधिष्ठान असते त्याचे हे उदाहरणच म्हणावे लागेल. कारण भंडारा म्हणजे हळद आणि हळद म्हणजे औषध. एखादी जखम झाली तर पूर्वीपासूनच आजतागायत जखमेवर हळद टाकण्याची प्रथा आहे. आणि आयुर्वेदामध्ये हळद ही बहुगुणी औषधी मानली जाते. उदा.आवाज बसला, घसा आला, पडसे झाले, खोकला आला तर अजूनही हळददूध पिण्याची प्रथा आहे. आजीबाईच्या बटव्याची परंपरा अजूनही समाजामध्ये चालू आहे. अशा या प्रचलीत जीवनोपयोगी प्रथामधून कधी कधी जुन ते सोन म्हणण्याची सत्यता स्विकारावी लागते.

धनगर समाजात रविवार या वाराला जास्त महत्व आहे. कारण खंडोबाचे भक्त रविवार हा दिवस पवित्र मानतात. या दिवशी काही लोक वारी मागतात. वारी म्हणजे पाच घरी हातात ताम्हण घेऊन फिरणे. पाच घरी जाऊन "वारी खंडोबाची" म्हणून ओरडतात. जे त्या भांडयात पीठ जमा होईल त्याची घरी येऊन भाकरी करायची व ती घरातील सर्वांना वाटायची. त्यामुळे खंडोबा त्या घरास कधीही अन्नाची कमतरता भासवू देत नाही असे मानतात. काही घरातून चंपाषष्ठीच्या दिवशी वारी मागतात ती पुरण पोळीची वारी असते. देवीचा वार मंगळवार व शुक्रवार ओळखला जातो. याचा उद्देश देवीची भक्ती करणेअसा आहे.या दिवशी अनेक स्त्रिया कडजाई, वडजाई, यलंबाई, मरीआई, लक्ष्मीआई यांची पूजा करतात. खण नाराळाने ओटी भरतात. उपवास करतात व आपले मागणे मागतात. एकंदरीत धनगरी देवांच्यामध्ये भंडाऱ्यास फार महत्व आहे. हे खालील पदावरून स्पष्ट होते.

आठा दिवसा आदितवारी । भंडाराची गरदी भारी ।
वाघे मुरळया येळकोट करी । धनधन दनानी पैभरी ।
गडाला नवलाख पायरी । त्यावर मंदीर सोनेरी ।
तेथे मुरारी मागे वारी । शांताराम कवन करी ।।15

दर सोमवतीला म्हणजे श्रावण महिन्यात येणाऱ्या सोमवारी जेजुरीच्या खंडोबाची मोठी यात्रा भरते. या यात्रेवेळी येथे गाढवे व खेचरांचा मोठा बाजार भरतो. या यात्रेवेळी असंख्य भाविक देवाच्या नावाने खोबऱ्याची उधळण करतात. आज सोने चांदीच्या मुद्रा नाहीत म्हणून खोबऱ्याचा वापर करतात. देवाला खेटे घालण्याची प्रथा मात्र परंपरेने आजही चालत आलेली सर्व थरात दिसून येते. देवांना नैवेद्य दाखवितात. नृत्य करीत असताना, गीते म्हणताना देवाच्या नावाने जयघोष केला जातो. खंडोबाच्या नावानं चांगभलं, येळकोट येळकोट जयमल्हार, बिरदेवाच चांगभलं, डोंगराच्या हरीच चांगभल, वडजाईच चांगभल अशा जोरजोरात हात हालवून घोषणा दिल्या जातात.

अशाप्रकारे या परिसरात देवदेवता आढळून येतात. व त्यांच्या पूजा अनेक सणावाराला केल्या जातात. तात्पर्य लोकसाहित्यात देवांची , संतांची स्तुती केलेली आढळते. लोकसाहित्यात महाभारतातील, रामायणातील, कथापुराणातील कितीतरी संदर्भ येतात. तसेच प्रपंच व परमार्थाचा बंध अनुबंध तेथे साधलेला आढळतो. त्यामुळे लोकसाहित्यात नितीचे दर्शन घडते, धर्माचे दर्शन घडते जे सर्व जीवनात हे सर्व लोकसाहित्यात पहावयास मिळते आणि म्हणूनच खरेखुरे लोकसाहित्य असेच या साहित्याला म्हणावे लागेल. लोकसाहित्य हा आमच्या जीवनाचा आरसा आहे.या आरशात आम्हाला आमचा समाज दिसतो. आम्हाला आमच जीवन दिसत आणि यात आमची संस्कृती आहे हे ही आम्हाला पटते. संस्कृतीच्या कोणत्या टप्प्यावर आम्ही आलो आहोत हे लोकसाहित्य आम्हाला दाखवून देते हे जीवनाचे बंध–अनुबंध समजून घेण्यासाठी आम्हाला इतरांच्या मध्यस्थीची गरज भासत नाही. लोकसाहित्यच आम्हाला हे आमच्या जीवनाचे बंध–अनुबंध निदर्शनास आणून देते. म्हणून लोकगीते आणि पर्यायाने धनगरी गीते हा लोकसाहित्याचा अमोल ठेवा आहे. हेच मला येथे दाखवून द्यावयाचे आहे.

इ) **खंडाळा तालुक्यातील धनगरी लोकगीतातील निवडक देवदेवतांच्या कथा :-**

(खंडोबा, बिरोबा, वाग्देव, मस्कोबा इ.)

महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र या तीन प्रदेशात प्रामुख्याने आढळणारा देव म्हणजे बिरदेव, खंडोबा होय. पण खऱ्या अर्थाने या देवांना प्रतिष्ठा, मान मिळाला तो महाराष्ट्रातच !

महाराष्ट्रात डोंगराळ भागात हिंडताना माळरानावर, एखाद्या उंचवटयावर, एखाद्या चिंचेच्या, लिंबाच्या झाडाखाली बिरदेव खंडोबाची किंवा इतर अनेक देव-देवतांची ठाणी पहायला मिळतात. या सर्व ठाण्यात धनगरी लोकांच्या यात्रा-जत्रा भरतात. ही सर्व ठाणी त्यांच्या हंगामी भ्रमणाच्या मार्गावरही पाहावयास मिळतात. या ठाण्यातल्या यात्राजत्रात, अनेक उत्सवात धनगर गीततकारांनी स्वतः रचलेली कथागीते रात्रभर गायली जातात. "सुंबरान मांडील" या ओळीनं त्यांच्या कथागीतांची सुरवात रोमहर्षक होते. या कथागीत प्रकारातून ते आपल्या देवांच्या, वीरांच्या, कर्तृत्वाच्या अद्‌भुत रोचक कथांचे विश्व उघडे करतात. अशा कथागीतांच्या गायनाप्रमाणेच त्याच्या रचनाचे सातत्य आजवर टिकून आहे. या कथागीतामधून दक्षिणेच्या धार्मिक, सामाजिक इतिहासाचे अंतरंग उघडे होते.

लोणंद परिसरात बिरोबा, वाग्देव, मस्कोबा तर कडजाई, वडजाई, लक्ष्मीआई, मरीआई अशा प्रमुख देवदेवता आहेत. त्यांची मंदिरे ही प्रशस्त आहेत. त्यांच्याविषयी लोकमानसात ज्या कथा प्रसिध्द आहेत त्या पाहणे आवश्यक आहे.

**खंडोबा :-**

आजच्या काळातही खंडोबा एक जागृत स्थान म्हणून ओळखले जाते. तर बिरोबा, मस्कोबा, वाग्देव एक सामर्थ्यशक्ती देव म्हणून त्यांचे श्रेष्ठत्व आजही लोकांना मान्य आहे. या देवांची पूजा केल्यास ते भक्तांना पावतात अशी दृढ समजूत लोकांच्यात आहे.

खंडोबा हा नवसास पावणारा देव म्हणून ओळखला जातो. खंडोबाच्या अनेक कथा आजही लोकमानसात प्रचलीत आहेत. त्यात "म्हाळसा खंडोबा व बाणाई खंडोबा विवाह"[16] ही कथा प्रसिध्द आहे.

खंडोबाने म्हाळसा व बाणाई या दोन बायका कशा मिळविल्या याची रोमहर्षक हकीगत या कथात पहावयास मिळते. ती अशी ,

अमृत मिळविण्यासाठी एकदा देव आणि दानव यांनी समुद्रमंथन केले. त्यावेळी दैत्यांना भुलविण्यासाठी भगवान विष्णूने मोहिनीरूप धारण केले. शंकराला यातले काहीच माहिती नव्हते. मोहिनीचे रूप पाहून शंकर अतिशय खूष झाले. ते तिच्या मागे धावू लागले. तेव्हा मोहिनी शंकराला म्हणाली "तू पुढे मार्तंड भैरवाचा अवतार घेशील तेव्हा मी म्हाळसा म्हणून अवतार घेईल व तुझी इच्छापूर्ती करीन."

यासंबंधी आणखी एक मजेशीर गोष्ट आहे –

नेवासे नावाच्या गावात तिमशेट नावाचा एक वाणी होता. तो खूप श्रीमंत होता. कशाला काही कमी नव्हते. त्याला एकच दु:ख होते ते म्हणजे त्याला मुलबाळ नव्हते. तो शंकराचा मोठा भक्त होता. दिवसाचा बराचसा वेळ तो शंकराच्या पूजेत घालवीत असे. याचवेळी शंकरांनी पार्वतीला सांगितले "तू तिमशेट वाण्याच्या घरी अवतार घे योग्यवेळी मी तुझ्याशी लग्न करीन." पार्वती तिमशेट वाण्याच्या घरी गेली. तिमशेट वाणी शंकराची पूजा करीत होता. पार्वती त्याला म्हणाली, "भगवान शंकर तुझ्यावर प्रसन्न झाले आहेत. तुला काय हवे ते माग." तिमशेट वाणी म्हणाला, "मला संतान व्हावे." तेव्हा पार्वती त्याला म्हणाली "तू डोळे झाक". त्याने डोळे झाकल्यावर पार्वतीने बाळरूप घेतले ती रडू लागली. तिमशेट वाण्याने डोळे उघडले. बघतो तो काय? तेथे देवी नव्हती. त्या जागी एक लहान मुलगी रडते आहे.

तिमशेट वाण्याला खूप आनंद झाला. ही मुलगी म्हणजे शंकराचाच प्रसाद असे त्यास वाटले. वाण्याने त्या मुलीचे नाव ठेवले म्हाळसा. म्हाळसा मोठी झाली. आता आपल्या मुलीचे लग्न करावे असे त्याला वाटले. तेव्हा म्हाळसा म्हणाली – "बाबा, भगवान शंकरांनी मणिमल्लासुरांना ठार मारण्यासाठी मार्तंड भैरव अवतार घेतला आहे. तोच माझ्याशी लग्न करील. काही दिवसांनी खंडोबा तिमशेट वाण्याच्या स्वप्नात आला. तो त्यास म्हणाला, "तू आपली मुलगी घेऊन पाली या गावी यावे. तेथे मी तुझ्या मुलीशी लग्न करीन. तिमशेठ वाणी आपली मुलगी

म्हाळसा हिला घेऊन पाली या गावी आला. विवाहाची सगळी तयारी झाली. मार्तंड भैरवही आपल्या सर्व गणांसह तेथे आला. पौष महिना पौर्णिमेचा दिवस त्या दिवशी खंडोबा आणि म्हाळसा यांचे मोठया थाटात लग्न झाले. खंडोबा म्हाळसाकांत झाला.

बाणाई ही खंडोबाची दुसरी बायको ही बाणासुराची मुलगी म्हणून तिला बाणा किंवा बाणाई असे म्हणतात. ही खंडोबाची बायको कशी झाली याविषयी एक मजेशीर गोष्ट आहे.

इंद्र हा देवांचा राजा त्याला सात मुली होत्या. एकदा इंद्राने त्यांना विचारले,

"मुलींनो, तुमच कल्याण करणारा कोण बरं ?" त्यातील सहा मुली म्हणाल्या, "तुम्ही स्वर्गाचे राजे, सगळयांना सुख वैभव तुम्हीच देता. आमचे सुध्दा कल्याण तुर्म्हीच करता दुसरे कोणीच नाही. परंतु सातवी जी मुलगी होती तिचे नाव होते बाणाई. ती म्हणाली –"माझे कल्याण मीच करणार ?"

बाणाईच्या या उत्तराने इंद्र रागविला. त्याने बाणाईला लहान मुलाचे रूप दिले. तिला एका पेटीत बंद केले. ती पेटी त्याने एका रानात टाकली. ती पेटी एका धनगराला मिळाली. त्याने ती पेटी उघडली. आत एक सुंदर मुलगी ! धनगराला खूप आनंद झाला. त्याने तिला आपल्या घरी नेले. आपल्या मुलीप्रमाणे सांभाळले. त्याने तिचे नाव ठेवले बानू !

बानू मोठी झाली. ती शंकराची भक्ती करू लागली. शंकर तिच्यावर प्रसन्न झाला. शंकराने मुनष्यरूपात बानूला दर्शन दिले. शंकराने तिला अद्‌भुत घडावा दिल्या. आणि सांगितले "या घडावा पायात घाल म्हणजे तुला आवडणाऱ्या वराचे दर्शन होईल." शंकर गुप्त झाला. बानूने त्या घडावा पायात घातल्या. ती जेजूरीला खंडोबाच्या महालात आली. तेथे खंडोबा म्हाळसासह बसला होता. खंडोबाला पाहून तिला आनंद झाला. हाच आपला पती व्हावा असे तिला वाटले. मग बानूने खंडोबाला एक पत्र लिहिले "पत्नी म्हणून माझा स्विकार कर." अशी तिने खंडोबाला विनंती केली.

बानूचे पत्र वाचून खंडोबा काळजीत पडला. आता बानूशी लग्न कसे करावे याचा तो विचार करू लागला. मग खंडोबा म्हाळसासह सारीपाट खेळू लागला. खेळात जो हरेल त्याने बारा वर्षे वनवास भोगावा असे ठरले. खेळ सुरू झाला. खंडोबा हरला. ठरल्याप्रमाणे खंडोबा वनात निघून गेला. बिचारी म्हाळसा दु:खी झाली.

खंडोबाने धनगराचे रूप घेतले. तो बानूच्या वडीलांकडे आला व मेंढया राखण्याचे काम करू लागला. एक दिवस खंडोबा मेंढया घेऊन नदीवर गेला. तेथे त्याने साऱ्या मेंढयांना ठार मारले. हे समजताच सगळे धनगर तेथे आले. बानूही आली तेव्हा खंडोबा बानूला म्हणाला "माझ्याशी लग्न करशील तर सगळया मेंढया जीवंत करीन." हा खरा कोण आहे हे बानूला माहित नव्हते. जेजूरीचा खंडोबा तिला पति म्हणून हवा होता. शेवटी इलाज नाही. म्हणून बानू लग्नाला तयार झाली. तेव्हा खंडोबा देवाने साऱ्या मेंढया जिवंत केल्या. लगेच खंडोबाने बानूला आपल्या घोडयावर घेतले. बानू रडू लागली. तेव्हा त्याने आपले खरे रूप दाखविले. बानू आनंदीत झाली. मग नळदुर्ग येथे बाणाईचे खंडोबाशी मोठया थाटात लग्न झाले.

खंडोबा बाणाईला घेऊन जेजूरीला आला. खंडोबा परत आला म्हणून म्हाळसा आनंदीत झाली. पण बाणाई खंडोबाची बायको म्हणून आली हेपाहून ती रागावली. घरात रोज भांडणे सुरू झाली. शेवटी खंडोबाने वरचा अर्धा डोंगर म्हाळसाला दिला व खालचा अर्धा डोंगर बाणाईला दिला. बाणाई गडाखाली राहू लागली. दर रविवारी खंडोबा बाणाईला भेटण्यास गडाखाली येऊ लागला. बाकीचे दिवस तो गडावर म्हाळसा बरोबर राहू लागला.

आजही जेजुरीला गडाखाली खंडोबा–बाणाई भेटीचा समारंभ दर रविवारी करतात. अशी लोकप्रिय खंडोबा–बाणाई विवाहाची कथा जनमानसात आजही प्रचलीत आहे.

**बिरोबा :–**

बिरोबाच्या संदर्भात चिलयाबाळाची कथा तर प्रत्येक धनगरी स्त्री–पुरूषचा आरसाच आहे. चिलयाबाळाच्या कथेतून[17] चिलयाबाळाचा जन्म त्याचे बालपण त्याच्या आईचा उदारपणा दिसून येतो.

चांगुणा म्हणते की, "सत्कार्यासाठी आपण भोजन घालायचे." त्यावेळी नारद अंतराळात विचार करून चांगुणाच्या वाडयावर येऊन तो तिला म्हणतो, "मी सप्तपाताळ फिरून आलो आहे. मला वेळ नाही." तशाच स्थितीत नारद कैलास पर्वतावर शंकराच्या वाडयावर गेला. आणि शंकराला सांगू लागला की सप्तपाताळात फक्त ठिकाणी चिल्याराजा प्रत्येकाला इच्छाभोजन देतो तेव्हा शंकर नारदाला म्हणतात की मी स्वतःच जाऊन तिला सत्वापासून हरविणार.

शंकर चांगुणाच्या वाडयावर आले. व शंख वाजविला. म्हणून चांगुणा त्यांना हात जोडून पाया पडून वाडयावर आणते. त्यावेळी शंकर चांगुणाला म्हणतात की माझ्या अंगास वास येत आहे. मी येथूनच माघारी जातो. तेव्हा चांगुणा म्हणते "मी तुम्हाला अंघोळ घालते. इच्छा भोजन देते." तेव्हा श्री शंकरांनी हीच योग्य वेळ आहे. हे ओळखून त्यांनी चांगुणाला पुरूषाचे मांस मागितले. म्हणजेच तुझ्या लहान सात वर्षाच्या चिल्याबाळाचे मांस दे. चांगुणाला वाईट वाटते. पण आपले सत्व जाईल याची भिती तिला असते. चिल्याबाळ खेळायला गेलेला असतो. त्याला हाक मारून चांगुणा बोलावते व त्याला म्हणते, "त्याला इथे अतिथी आले आहेत त्यांना तुझे मांस दिले नाही तर आपले सत्व जाईल. तेव्हा मुलगा आईला म्हणतो – "आई जन्मात पुण्य महत्वाचे असते तेव्हा त्यांना इच्छाभोजन माझे देऊन टाक."

आईने मुलगा मांडीवर घेतला व त्याचे शीर हातात घेऊन सुरीने बाळाचे शीर कापू लागली. रक्ताचा पाट वाहू लागला. थोडया वेळाने जेवण तयार केले व साधुला बोलावून तिने जेवणास उठविले. परंतु शंकर रागाविले व म्हणाले "मला नाशवंत शरीराचे भोजन नको त्यामुळे तुझे सत्व गेलेले आहे." तेव्हा चांगुणा म्हणते की मी त्याचे शीर तोडून जेवण करते पण साधु म्हणाले की मी निपुत्रिकाचे जेवण करीत नाही. पण सत्वशील चांगुणा म्हणते की मला मूल नाही मी साधुजवळ जाऊन त्याचे पाय धरते. तेव्हा शंकराला चांगुणाची दया आली व त्यांनी सांगितले की तुझ्या मुलाला हाक मार. चांगुणाने आपल्या मुलाला हाक मारल्यानंतर मुलगा जसा होता तसाच परत आला. त्याच्या पायात तोडे होते, हातात कोयऱ्या होत्या. चांगुणाला आपले मुल पाहून आनंद झाला. आपले मूल काखेला घेऊन तिने साधूची पूजा केली. तेव्हा शंकर पार्वतीला समजले की

आपल्यापेक्षा मोठे सत्वशिल' सावित्री चांगुणा आहे. तिच्या स्वभावाची माहिती सर्वांना समजली. शंकर तिला म्हणतात –

"चांगुणा तू मला जिंकलस, सत्व राखलस. तुला काय पाहिजे ते माग ?"

शंकरांनी चिल्याबाळाला राजगादी देऊन चांगुणाला कैलास पर्वतावर नेले. तेहतीस कोटी देवांच्या बायकांनी तिची पूजा केली. तेव्हा सर्वांना आनंद झाला. तेव्हा चांगुणा म्हणते पारबत्ती तुम्ही शंकराची पत्नी माझी पूजा करता काय ? तेव्हा चांगुणाला शंकर म्हणतात की, "तुझी माया अपार आहे. तू खरी सत्वशील आहेस."

अशा चांगुणा धनगर समाजात आजही आहेत. बाणाईसारख्या, अहिल्याबाई सारख्या स्त्रीयामुळे त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन धनगर स्त्रिया जीवन जगत असताना दिसतात. अशी ही चांगुण चिल्या बाळाची कथा प्रसिध्द आहे. अशीच सुरवंता–बिरदेवाची कथा रोचक आणि रोमहर्षक आहे.

<u>वाग्देव</u> :–

भगवान वाग्देव महाराज हे धनगर समाजाच्या उध्दारासाठी धनगर कुळात जन्माला आले भगवान वाग्देव महाराज यांच्या घरची परिस्थिती गरिबीची असल्यामुळे ते जनावरे सांभाळत वाग्देव महाराज खरे अवतारी पुरूष होते.

खंडोबा देवाच्या समोर बसून नामस्मरण, भजन करणे हा त्यांचा उद्योग असे. त्यांचा पोशाख म्हणजे लंगोटी, डोक्याला पिवळा पटका, अंगावर काळी घोंगडी, गळयात मल्हारी देवाची प्रतिमा व हातात व्याघ्रचर्मीची भंडारी असे त्यात देवाचा भंडारा असे. हातात कोटंबा व घंटा असे. सतत खंडोबाचे नामस्मरण करीत पण "वारी घाल" असे मुखाने म्हणत नसत. पंढरपुरच्या पांडुरंगाची वारी व जेजुरीच्या खंडोबाचे, कुरवलीच्या विठोबा–बिरोबा या कुलदैवताचे दर्शन घेणे. या गोष्टी त्यांच्या बालपणापासून चालत भगवान वाग्देव मिळणाऱ्या वस्तू व पैसे कृष्णा नदीत सोडत कारण कृष्णामाईला ते बहिण मानत असे लाखो रूपये व वस्तू कृष्णामाईल सोडल्याचे उल्लेख आहेत.[18] वाग्देवांनी केलेले चमत्कार आजही लोकांना विशेष वाटावे असे आहेत.

वाग्देवांनी जेजूरीच्या खंडेरायाचे दर्शन घेण्यासाठी रेल्वे थांबवली होती व दर्शन करून येईपर्यंत गाडी तेथेच उभी होती. नंतर ते गाडीत बसल्यावर पुन्हा बिघडलेली रेल्वे सुरू झाली. तसाच त्यांच्या जीवनातील दुसरा चमत्कार म्हणजे श्री. वाग्देव महाराजांची काही जनावरे गायी, शेळया व बकऱ्या रहिमतपूरहून कोणी गुराखी वगैरे नसताना सुखरूप वाठार येथे आल्याचे उल्लेख सापडतात. ही सर्व जनावरे रेल्वे गेटजवळ येताच रेल्वे थांबून गेट उघडून जनावरे रेल्वे लाईन क्रॅास करीत असत हा चमत्कार लोकांनी प्रत्यक्ष पाहिला आहे.[19]

सातारचे पीरवाडीतील श्री कोंडीबा महाराज, वर्धा हनुमानगडचे श्री रामदास परांजपे महाराज, शिर्डीचे साईबाबाचे सतशिष्य श्री दासगणू महाराज मुंबईस ज्यावेळी येत त्यावेळी वाग्देव महाराजांचे दर्शन घेत अशी अनेक उदाहरणे आहेत. मुंबईचे कृष्णराव थळी यांना वाग्देव महाराजांच्या दर्शनामुळे पाच मुलगे झाले होते. वाग्देव महाराजांचा पंचधातूचा झेंडा थळी यांच्या घरी मुंबईत आजही आहे. तसेच "विठ्ठल रखुमाई – पंढरी रखुमाई" हा श्री वाग्देव महाराजांचा मंत्र होता. वाठार येथील वाग्देवांच्या मंदिरातील घोंगडीच्या धाग्याने रोग मुक्त होता येते असा आजचा लोकांचा अनुभव आहे.

श्री वाग्देव महाराज म्हणजे अनेक चमत्कार दाखविणारे, भगवान शंकराचे व प्रत्यक्ष खंडोबाचे अवतार मानणारे होते. वयाच्या नव्वदाव्या वर्षी म्हणजे 1936 ला ते निजधामास[20] गेले. आपला देह ठेवण्यापूर्वी सर्व भक्तांना तशी पूर्व सूचना दिलेली होती. इतकी अचूक भविष्यवाणी सांगणारे श्री समर्थ वाग्देव महाराज होते.

अशाप्रकारे श्री शंकराचे, खंडोबाचे एक शिष्य असे समर्थ वाग्देव महाराज म्हणून आजही या परिसरात लोकांच्या मनात हृदयात त्यांना विशेष स्थान आहे. अशाचप्रकारे वीरच्या मस्कोबाची कथा विशेष महत्वाची आहे.

**मस्कोबा :–**

श्री मस्कोबा म्हणजे भैरवनाथाचा अवतार होय. त्यांची आजची सामर्थ्यशक्ती हो परंपरेने चालत आलेली पण श्रेष्ठ प्रकारची आहे हे दिसून येईल.

श्री मस्कोबा हे कर्नाटक राज्यातील बेळगावचे स्थान. पण कमळाजी याच्या भक्तीने ते वीर गावी आले. या दोघांची अगाधलीला व वीर गावी आल्यानंतर लोकांनी त्यांची केलेली पूजा खालील कथेतून दिसून येते.

कमळाजी हा वीर गावचा रहिवासी असून शेळया मेंढया पाळणेहा त्याचा जातधंदा होता. त्यांना आईवडील व लहान मुलगे होते. चराऊ रान असेल तेथे शेळया मेंढया नेऊन तेथेच वास्तव्य करीत. एकदा दुष्काळ पडला असता जनावरांचे चारापाण्याअभावी हाल होवू लागले. कमळाजीस काळजी पडली व इतराप्रमाणे आपणही गाव सोडून शेळया मेंढयाच्या उपजिविकेसाठी दूर बाहेर गावी जावे असे ठरविले.

तो बकऱ्याचा वाडा घेऊन खूप दूर म्हणजे बेळगावच्या हद्दीत गेला. तेथे विपुल चारा असल्याने त्याने तेथेच वास्तव्य केले. कमळाजी हा भाविक होता तो भैरवदेवाची नेमाने पूजा करी. त्या भागात त्या देवास "सोंगल सोमनाथ" म्हणून ओळखतात. तो बरेच वर्षे तेथेच राहिला. भैरवनाथ त्याची भक्ती पाहून कमळाजीस प्रसन्न झाले.

कालांतराने कमळाजीस गावची ओढ लागली. तो गावी निघाला. त्याच्या डोळयात पाणी आले. माझे स्मरण करताच मी तुला भेट देईन असे देवाने सांगितले. तो आपल्या शेळयामेंढया व संसार घेऊन गावी आला. वीरच्या पूर्वेस "बोरबन" या चराऊ रानात राहत असताना देवाचे चिंतन करीत दिवस गेले. पण देवाच्या विरहाने तो सोंगलला देवाला भेटावयास गेला. सतत आपल्या सानिध्यात असावे असे बोलू लागला. अश्रुपूर्ण नयनाने त्याने देवास मिठी मारली. देवाने त्याची भक्ती पाहून गावी येण्याचे कबूल केले तेव्हा कमळाजीस अत्यांनद झाला. देवानी सांगितले की आपल्या शेळयामेंढयांच्या कळपात वांझ गाय आहे तिला पान्हाफुटेल व बोरबनातील वठलेल्या हिवराचे झाडास पालवी फुटेल तेव्हा मी तेथे असेल.कमळाजी गावी आल्यानंतर त्याला एका रविवारी देवाची आराधना करीत असताना देवाने सांगितल्याप्रमाणे दर्शन झाले. देवभेटीचा त्याला अत्यानंद झाला. त्याने सर्परूपी देवास आपल्या घोंगडीत घेतले. यथासांग पूजा अर्चाकरून देवाची भेट घेऊ लागला.

कमळाजीने देवास सतत जवळ राहण्यास विनवल्याने देवाने ते मान्य केले. वीर गावात राऊताच्या पडीक जमीनीत असणाऱ्या वारूळात ठेवले. तो त्यास पुजाअर्चा करणे, दूध पाजणे दररोज करू लागला. ती जमीन त्याच्या भाच्याने (जमदाडे) नांगरली. ते वारूळही नांगराले गेले. नांगराचा फाळ वारूळात जाताच तो देवाचे डोक्यास लागला. त्यामुळे देव क्रोधयुक्त झाल्याने बारा बैलाचा नांगर व नांगऱ्या यांना आत ओढून घेतले. ते सर्व गुप्त झाले. कमळाजीस हा प्रकार समजला. त्यांच्या अंगात देव संचारला त्याने गुलाल "श्रीनाथ साहेबांचा चांगभले" असे म्हणून तो वारूळावर टाकला. तोच सर्व काही पूर्ववत झाले. आपण इथे कशासाठी जमला आहात असे नांगऱ्याच विचारू लागला. सर्वांनी त्या वारूळाची पूजा केली.

त्या जागेवर गावकऱ्यांनी मंदिर बांधण्याचे ठरविले. तेथे एक तांदळा "गोल गोटा" सापडला. त्याची तेथे प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. या घटनेने कमळाजीच्या मुलास आनंद झाला. त्या मुलाने शिंगाप्रमाणे तोंडातून आवाज काढला. म्हणून त्यास "शिंगाडे" दुसऱ्या मुलाने तरवडाचा पाला आणून वारूळ पुजले म्हणून त्यास "तरडे." तिसऱ्या मुलाने बुरमूस आणून वारूळावर छाया – सावली तयार केली म्हणून त्यास "बुरूंगले", चौथ्या मुलाने हाताचे बोटाने ओठ वाजवले म्हणून त्यास "व्हटकर" व पाचव्याने अत्यानंदाने ढुंगणच वाजवले म्हणून त्यास "ढवाण" अशी नावे दिली. तीच नावे आजपावेतो शिंगाडे, तरडे, बुरूंगले, व्हटकर, ढवाण या आडनावाने ओळखतात.

कमळाजीने अंगात संचार आल्यानंतर देवास पाच मुले बळी देण्यास सांगितले ते त्याच्या पत्नीने मान्य केले. परंतु गावकऱ्यांनी त्याला विरोध केला. कमळाजी ठरल्यादिवसी आपल्या पाच मुलांना घेऊन त्या जागेवर आला. कमळाजीचा थोरला मुलगा घाबरला व पळून गेला. कमळाजीने उरलेल्या चार मुलांना बळी दिले. काही लोकांनी कमळाजीस नावे ठेवली. काही म्हणाले याला म्हणतात श्रध्दा व निष्ठा. कोणीतरी तालुक्याला जाऊन फौजदारला या घटनेची माहिती सांगितली. फौजदार आले त्यांनी पाहिले तर बकऱ्याचे शीर व धड त्यांना दिसले. फौजदारांनी लोकांना सांगितले की अशी फसवेगिरी पुन्हा करू नका व ते निघून गेले.

कमळाजी देवास म्हणाला देवा तुमची लिला, महिमा अगाध आहे. त्याने नमस्कार केला तोच ती मुले जीवंत झाली व इकडे तिकडे पाहू लागली. सर्वांना भैरव महिमा कळून आला. गावकऱ्यांनी कमळाजीस विचारून प्राण–प्रतिष्ठेचा दिवस निश्चित केला.

"माघ शुध्द पौर्णिमा" हा दिवस ठरला. कमळाजी सोंगल "सोनारीला" गेला. देवापुढे नतमस्तक झाला. देवास आपल्या गावी येण्यास कबूल केले. ज्या ठिकाणी तू पाठीमागे पाहशील तेथे मी लुप्त होईल असे देवाने सांगितले. कमळाजी गावी आला. नीरा नदीत उंच खडकावरून त्याने मागे पाहिले. तोच त्याला घोडा नाचत असलेला दिसला. तो लोळू लागला त्याला चूक कळली. देवाला तो क्षमा मागू लागला. देवास दया आली. कमळाजीने देवास गावात नेले. तेथे त्याची प्राणप्रतिष्ठा केली. कमळाजीने अंगात येवून लोकांस सांगितले की माघ शुध्द पौर्णिमा ते माघ वद्य दशमी पर्यंत माझा उत्सव करावा. माझे भक्तगण गोळा होतील. व ते माझे बंशज वर्षभर जे घडेल त्याचे भविष्य सांगतील. यामध्ये वार्षिक पर्जन्यमान, धारणधुरण, रोगराई, वारसाहक्क, व दैनिक जीवन, प्राणीमात्र व पिके याबाबतची पूर्वसूचना देतील. याप्रमाणे या वेळेपासून आजपावेतो हा उत्सव "जत्रा" या नावाने दरवर्षी साजरा होत आहे.

पुढे कमळाजी अतिवयस्कर झाला. मी देवाची प्रार्थना करून समाधीस्त होणार असे मुलांना त्याने सांगितले. पुढे मुलांनी त्याचे समाधी मंदीर बांधले ते आजही वीर गावी पहावयास मिळते. असा होता तो श्रीनाथ सेवक कमळाजी धनगर.[21]

या मस्कोबाच्या कथावृत्तावरून रा.चि.ढेरे यांनी मस्कोबाचे अलौकिकत्व स्पष्ट केले आहे व मस्कोबा हा एक क्षेत्रपती[22] आहे असा या देवाचा गौरव केला आहे. अशाप्रकारे धनगरी लोकगीते व लोकसंस्कृतीचे बंध अनुबंध एकमेकास कसे एकजीव असतात ते पाहिले आणि म्हणूनच लोकसाहित्य हे केवळ स्वप्न रंजन नाही तर तो वास्तव जीवनाचा आविष्कार आहे हेच खरे. साहित्याने जीवनापासून दूर जावू नये. हे ही तितकेच खरे. तात्पर्य पिढयानपिढया चालत आलेले लोकसाहित्य मानवी जीवनाच्या हातात हात घालून वाटचाल करीत आलेले आहे. म्हणजेच मानवी जीवन आणि लोकसंस्कृती यांचा संबंध घनिष्ठ आहे.

# संदर्भ सूची


1. "लोकसाहित्याचे अंतप्रवाह" ले.डॉ.प्रभाकर मांडे, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे – 30, पहिली आवृत्ती – 1975, पृष्ठ क्रं.4
2. तत्रैय.
3. तत्रैय, पृष्ठ क्रं.6
4. तत्रैय, पृष्ठ क्रं.8
5. तत्रैय
6. "लोकसाहित्य, एक स्वतंत्र अभ्यास क्षेत्र, दुसरी आवृत्ती – 1993, प्रकाशक, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, 830 सदाशिव पेठ, पुणे – 4, पृष्ठ क्र.3
7. महाराष्ट्र राज्य धनगर समाज महासंघ, स्मरणीका, पहिले अधिवेशन, चांदवड जि.नाशिक, 18 आक्टोंबर 1992, संपादक – आ.आण्णा डांगे, प्रकाशक – जी.डी.पाटील, अध्यक्ष महाराष्ट्र राज्य धनगर समाज महासंघ, पृष्ठ क्र.29
8. "मराठी स्त्रीगीते", डॉ.शरद व्यवहारे, प्रथम आवृत्ती, 2 आक्टो. 1991 प्रतिभा प्रकाशन, पृष्ठ क्र.93.
9. तत्रैय.
10. तत्रैय.
11. श्री विठ्ठल बिरदेव महात्म्य, प्रकाशक श्री वसंतराव दत्तात्रय जाधव, ब्लॉक नं.10, शिव अपार्टमेंट, नागाळा पार्क, कोल्हापूर – 3, पृष्ठ क्रं.1
12. तत्रैय.
13. "दासबोध" प्रकाशक : केशव गणेश सारंगपाणी, आर्य भीषण मुद्रणालय 915/1, शिवाजीनगर, पुणे – 4, 1960, पृ.735
14. "श्री मल्हारी मार्तंड", लेखक, श्री.म.स.घोलप, उमा पब्लिकेशन्स, पुणे – 30, नवीन आवृत्ती 1997, पृष्ठ क्रं.4.

15. तत्रैय – पृष्ठ क्रं.88

16. श्री खंडोबाच्या गोष्टी, श्रीकांत गोवंडे, अनमोल प्रकाशन, पुणे – 2, आवृत्ती जानेवारी 1997, पृष्ठ क्रं.14 ते 23.

17. "धनगरी ओवी", चिलोया बाळाची (कॅसेट) पांडुरंग कोळेकर आणि मंडळी, वींग्ज म्युझिक कं. मुंबई.

18. श्री वाग्देव महाराज स्तवन, प्रकाशक, श्री.वाग्देव महाराज देवस्थान ट्रस्ट, मु.वाठार स्टेशन, ता.कोरेगांव, जि.सातारा, पृष्ठ क्र.5

19. तत्रैय, पृष्ठ क्रं.6

20. तत्रेय, पृष्ठ क्रं.8

21. श्रीनाथ म्हस्कोबा दर्शन, प्रकाशक, प्रविण दत्तात्रय क्षीरसागर, वीर, ता.पुरंदर, जि.पुणे, राजेंद्र प्रिंटिंग प्रेस, सासवड, पृष्ठ क्रं.6 ते 13.

22. "लज्जागौरी" रा.चिं.ढेरे, श्री विद्या प्रकाशन, पुणे , प्रथमावृत्ती 20 जून 1978, पुनमुद्रण – 26 जाने. 1988, पृष्ठ क्र.188